## तळकोकणात अवकाळी पावसानंतर उष्णतेमध्ये वाढ



**सावंतवाडी :** तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील अनेक गावांना रविवारी सायंकाळी वादळीवारा, गारपीट आणि जोरदार पावसाचा तडाखा बसला. त्यानंतर सोमवारी (दि.२४) जिल्ह्यात सकाळपासूनच प्रचंड उष्णता जाणवत होती. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात रविवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीट झाली. यात केळी, काजू आणि आंबा पिकाला हानी पोहचली. अनेक घरांवर झाडांच्या फांद्या पडल्याने नुकसान झाले. या फांद्या वीजवाहिन्यांवरही पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. यानंतर सोमवारी सकाळच्या किमान तापमानात काहीशी वाढ झाली. त्यानंतर किमान तापमान ३८ सेल्सिअसपर्यंत पोहचले होते. पर्यावरणीय समतोल ढासळत चालला असून आंबा, काजू बागायतदारांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २२०
www.ramprahar.com

मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


नवी मुंबई विमानतळ परिसरात तिसरी मुंबई साकारणार/२

लोणशी आदिवासीवाडीतील विद्यार्थी आर्थिक साक्षर!/५

उदय देवरे खासदार श्री किताबाचा मानकरी/८


# कृषी क्षेत्राचा वेगाने विकास –पीएम मोदी




**भागलपूर : वृत्तसंस्था**

गेल्या १० वर्षात देशातील कृषी क्षेत्राचा वेगाने विकास झाला आहे. आपल्या लाखो लहान शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीमुळे बाजारपेठेतील त्यांची उपलब्धता वाढली आहे. यासोबतच शेतीचा खर्च कमी झाला आणि उत्पन्नही वाढले आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. २४) केले.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान मोदींच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे आयोजित कार्यक्रमात झाले. देशातील सुमारे ९.८ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे २२ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, जितन राम मांझी, राजीव रंजन सिंह, गिरिराज सिंह, चिराग पासवान यांच्यासह एनडीएचे नेते उपस्थित होते.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत केंद्र सरकार देशातील गरीब शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत देते. तीन हप्त्यांमध्ये दर चार महिन्यांनी हा निधी दिला जातो. या योजनेला सहा वर्षे पूर्ण झाली आहेत.

पीएम किसान निधीचा १९वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी देशभरातील शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, पीएम किसान योजनेला सहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देशभरातील आपल्या शेतकरी बंधू-भगिनींना खूप खूप शुभेच्छा. आतापर्यंत सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात पोहचले आहेत ही माझ्यासाठी खूप समाधान आणि अभिमानाची गोष्ट आहे. आमचा हा प्रयत्न अन्नदात्यांसाठी आदर, समृद्धी आणि नवीन शक्ती देत आहे.

# पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी पाऊल उचलले पाहिजे –आमदार प्रशांत ठाकूर

## पनवेल मनपाच्या गॅस शवदाहिनी, शौचालयाचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी पाऊल उचलले पाहिजे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २४) पनवेल महापालिकेच्या विविध कामांच्या शुभारंभावेळी केले.



पनवेल महापालिकेच्या माध्यमातून कामोठे सेक्टर १५ येथे सिडको हस्तांतरीत गॅस शवदाहिनी तसेच कळंबोली मॅकडॉनल्डसमोर सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहे. शवदाहिनीचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर आणि सार्वजनिक शौचालयाचे लोकार्पण आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमांना माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, बबन मुकादम, अमर पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका मोनिका महानवर, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, भाऊ भगत, हर्षवर्धन पाटील, हरजिंदर कौर, विद्या तामखडे, प्रदीप भगत, राजेश गायकर, अशोक मोटे, उपायुक्त वैभव विधाते यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# ‘शेतकरी सन्मान’चे वार्षिक १५ हजार रुपये देणार –मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधीतून वार्षिक १२ हजारांऐवजी १५ हजार रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २४) केली. पीएम किसान सन्मान योजनेच्या १९व्या हप्त्याचे वितरण सोहळ्यानिमित्त वसंतराव नाईक कृषी विस्तार प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.





या वेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पीएम किसान आणि नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून १२ हजार रुपये दिले जातात, परंतु त्यामध्ये आता तीन हजार रुपयांची अतिरिक्त भर टाकली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षाला १५ हजार रुपये मिळतील.

नमो शेतकरी सन्मान निधी योजनेवर विरोधक सुरुवातीला टीका करत होते. हास्यास्पद टिपण्णी करीत होते, परंतु शेती व्यवस्थापन करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात काहींच्या मते थोडीशी असलेली ही रक्कम मोठा दिलासा ठरली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी पीएम किसान आणि नमो शेतकरी सन्मान निधी योजनेचा हप्ता १५ हजार रुपये करण्याचे आश्वासन भाजपने जाहीरनाम्यात दिले होते. त्याची आता पूर्तता होणार आहे.

## उष्माघाताचा पहिला बळी

**सांगली : प्रतिनिधी**

फेब्रुवारी महिन्यातच सूर्य जणू आग ओकत आहे. अशातच सांगलीत यंदाच्या उन्हाळ्यातील उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची घटना घडली आहे.

सांगली शहरातील हिराबाग कॉर्नर येथे आईसक्रीम विक्रेत्या व्यक्तीला उष्माघाताने भोवळ आली. त्यानंतर त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. रामपाल असे या व्यक्तीचे नाव आहे. रामपालचा मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे.

## भारतविरोधी घोषणा देणाऱ्या भंगारवाल्याला मालवणात दणका

**मालवण : प्रतिनिधी**

चॅम्पियन ट्रॉफीमध्ये भारताने रविवारी पाकिस्तानला पराभूत करून विराट विजय मिळवल्यानंतर देशभरात जल्लोष साजरा करण्यात आला, मात्र मालवण आडवणे येथील काही परप्रांतीय भंगार व्यावसायिकांनी भारतविरोधी घोषणा दिल्या. याचे पडसाद सोमवारी (दि. २४) मालवणात उमटले.



या घटनेची तत्काळ दखल घेत आमदार निलेश राणे यांनी परप्रांतीय भंगारवाल्यांच्या वस्तीमधील अनधिकृत बांधकाम हटविण्याचे पत्र मालवण नगरपालिका प्रशासनाला दिले. यावर नगरपालिका प्रशासनाने या अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवत कारवाई केली. या वेळी उपस्थितांकडून भारतमाता की जय...च्या घोषणा देण्यात आल्या.

## निवडक

### कुख्यात गुंड गजानन मारणेसह टोळीची पोलिसांकडून धरपकड

**पुणे :** आयटी अभियंत्याला १९ फेब्रुवारी रोजी मारहाण केल्याप्रकरणी कुख्यात गुंड गजानन मारणे याच्यासह त्याच्या टोळीविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या मारहाणीवेळी स्वतः मारणे जरी घटनास्थळी नसला तरी टोळी प्रमुख म्हणून तो रडारवर आला आहे. त्यालाही अटक करण्यात आली आहे.

### पंतप्रधान मोदींच्या ओबेसिटी वॉरिर्यसमध्ये १० जणांचा समावेश

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील लठ्ठपणाच्या समस्येवर जनजागृतीसाठी ओबेसिटी वॉरियर्स मोहिमेत १० जणांची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये उद्योगपती आनंद महिंद्रा, अभिनेते-नेते दिनेश लाल यादव उर्फ निरुहा, नेमबाज मनू भाकेर, वेटलिफ्टर मीराबाई चानू, अभिनेते व निर्माते मोहनलाल, ‘इन्फोसिस’चे सहसंस्थापक नंदन निलेकणी, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, अभिनेते माधवन, गायिका श्रेया घोषाल, खासदार सुधा मूर्ती यांचा समावेश आहे.

# खालापुरातील तीन डान्सबारवर छापा

## ३२ बारबालांसह ४० आरोपींवर गुन्हे दाखल

**अलिबाग, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तीन डान्सबार रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ३२ बारबालांसह एकूण ४० आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



खालापूर पोलीस ठाणे हद्दीत डान्सबारमध्ये बारबाला अश्लील हावभाव, संगीताच्या तालावर बीभत्स नृत्य करतात तसेच या बारमध्ये बांगलादेशी व अल्पवयीन बारबाला आहेत, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या बारवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे तीन पोलीस अधिकारी, २२ अंमलदार, सहा महिला अंमलदार तसेच बांगलादेशी प्रतिबंधक पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची तीन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. या पथकांनी समुद्रा बार, हॉटेल स्वागत बार व हॉटेल पूनम बार येथे छापे टाकले.

बारमध्ये मद्यप्राशन करत असलेल्या ग्राहकांबरोबर बारबाला संगीताच्या तालावर अश्लील हावभाव व बीभत्स नृत्य करताना आढळून आले. बारमधील कर्मचारी व ग्राहक त्यांना अश्लील हावभाव व बीभत्स नृत्य करताना प्रोत्साहित करीत होते. त्यामुळे तीनही बारवर कारवाई करून ३२ बारबालांसह एकूण ४० आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एलसीबीचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, निरीक्षक रूपेश नरे, उपनिरीक्षक अनिल गोसावी, लिंगप्पा सरगर, बांगलादेशी प्रतिबंधक पथकातील उपनिरीक्षक वाघमोडे, सहाय्यक उपनिरीक्षक राजेश पाटील, प्रसन्न जोशी, हवालदार यशवंत झेमसे, अमोल हंबीर, जितेंद्र चव्हाण, सचिन शेलार, रूपेश निगडे, विकास खैरनार, परेश म्हात्रे, सुदीप पहेलकर, अस्मिता म्हात्रे, रेखा म्हात्रे, अभियंती मोकल, भाग्यश्री पाटील, अर्चना पाटील, झुलिता भोईर, रसिका सुतार, शिपाई तुषार कवळे, मोरेश्वर ओमले, लालासो वाघमोडे, ओमकार सोंडकर, बाबासो पिंगळे, अक्षय जगताप, भरत तांदळे, ईश्वर लांबोटे, सागर थळे यांनी ही कारवाई केली.

# भ्रष्टाचारी नाना कोरडेचा आणखी एक प्रताप!

### एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेत चार कोटींचा अपहार

### अन्य दोन कर्मचारी सामील, तिघांवरही गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागात सुमारे सव्वाकोटी रुपयांचा अपहार करणारा वरिष्ठ सहायक नाना कोरडे याच्याविरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेत चार कोटी १२ लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात कोरडे याच्यासमवेत अन्य दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

आरोपी नाना कोरडे याने जि.प.च्या पाणीपुरवठा विभागातील रक्कम परस्पर हडप केल्याचे प्रकरण नुकतेच समोर आले होते. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. अपहार करणारा कर्मचारी हा पूर्वी महिला व बाल विकास विभागात कार्यरत होता. त्यामुळे तो कार्यरत असणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजना विभागातील मागील चार वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात आली. यातही कोरडे आणि त्याच्या साथीदारांनी चार कोटी १२ लाख रुपयांचा अपहार केल्याचे चौकशीत समोर आले आहे. बनावट वेतन फरकाची देयके बनवून त्यावर बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या करून ही रक्कम स्वतः च्या आणि इतर अशासकीय व्यक्तींच्या खात्यात त्याने जमा केली आहे.

या दुसऱ्या अपहारप्रकरणी जि.प.च्या महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी नाना कोरडे, जोतिराम वरूडे आणि महेश मांडवकर या तीन कर्मचाऱ्यांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेतील अपहार केलेल्या चार कोटी १२ लाख रुपयांपैकी दोन कोटी २३ लाख रुपयांची रक्कम नाना कोरडे याने एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या खात्यात परत जमा केली असल्याचे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास निरीक्षक किशोर साळे करीत आहेत.

दरम्यान, कोरडे याच्यावर यापूर्वी पाणीपुरवठा विभागातील एक कोटी २३ लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. उपअभियंता राहूल देवांग यांनी याबाबतची तक्रार दिली होती. कोरडे याने सात कर्मचाऱ्यांच्या नावाने वेतन फरकाची रक्कम दाखवून त्याची खोटी देयके तयार करून ही रक्कम स्वतःच्या व पत्नीच्या खात्यावर वळती केली होती.

# कृषीमंत्री कोकाटेंना दिलासा

## जिल्हा न्यायालयाकडून शिक्षेला स्थगिती



**नाशिक : प्रतिनिधी**

१९९५मधील एका प्रकरणात राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. आता ना. कोकाटे यांना कोर्टाने दिलासा दिला आहे. या प्रकरणाचे अपील काळ पूर्ण होईपर्यंत त्यांच्यावरील शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे.

कागदपत्र फेरफार करून फसवणूक केल्याच्या आरोपाखाली माणिकराव कोकाटे व त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात कोकाटे यांनी आव्हान दिले होते. त्याबाबत सोमवारी (दि. २४) सत्र न्यायाधीश नितीन जीवने यांच्या न्यायालयात ही सुनावणी झाली.

कोकाटे यांचे वकिल अविनाश भिडे यांनी राहुल गांधींच्या प्रकरणाचा दाखला देत ही शिक्षा चुकीचे असल्याचे म्हटले. १९९५ ते २०२५पर्यंत माणिकराव कोकाटेंकडून गुन्हेगारी कृत्य नाही. सलग अनेक वर्ष त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून काम केले. त्यामुळे त्यांच्या विरोधात दिलेल्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती मिळावी, अशी मागणी कोर्टात करण्यात आली. यावर अपील काळ पूर्ण होईपर्यंत या शिक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय कोर्टाने घेतला आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

## खारघर हत्याकांडातील दुसऱ्या आरोपीलाही अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे ओव्हरटेक करण्याच्या वादातून एका दुचाकीस्वाराची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणी फरार असलेल्या दुसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. त्याला मुंबईतील वांद्रे येथून अटक करण्यात आली.

फैजान इस्तियाक शेख (वय २२ वर्षे) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. फैजान शेख आणि त्याचा मित्र रेहान शेख या दोघांनी मिळून खारघर शहरात काही कामानिमित्ताने आलेल्या शिवकुमार शर्मा (रा. वाशी, नवी मुंबई) यांना हेल्मेटने जबर मारहाण करून त्यांची हत्या केली होती. हत्या करून दोन्ही आरोपी फरार झाले होते.

या हत्याकांडाचे पडसाद खारघरमध्ये उमटले होते. हिंदू संघटनांनी एकत्र येऊन आंदोलने केले. पोलिसांनी या घटनेतील आरोपी रेहान शेख याला अटक केली होती, मात्र दुसरा आरोपी फरार होता. अखेर त्याला क्राईम ब्रँच युनिट ३च्या पोलीस पथकाने वांद्रे येथून केली अटक. फैजान शेखला न्यायालयात हजर केले असता २८ फेब्रुवारीपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे.

# सागरी सुरक्षेसोबतच मत्स्योत्पादन वाढीसाठी एआयचा वापर महत्त्वाचा

## मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्याचा काळ हा एआय तंत्रज्ञानाचा काळ आहे. सागरी सुरक्षा बळकट करणे आणि मत्स्योत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केले.

समुद्रकिनाऱ्यांवर होणारी घुसखोरी रोखणे आणि सागरी सुरक्षा बळकट करणे तसेच सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी मंत्रालयात सोमवारी (दि. २४) एआय तंत्रज्ञानाचा वापर या विषयी मंत्री राणे यांनी एआय तंत्रज्ञानाविषयी काम करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.



चर्चेच्या सुरवातीला मत्स्य व्यवसाय व बंदरे विभागाची एआय तंत्रज्ञानाबाबतची गरज व्यक्त करून मंत्री राणे म्हणाले की, मत्स्योत्पादनात वाढ आणि सागरी सुरक्षा ही विभागाची प्राथमिकता आहे. सागरी मासेमारी आणि गोड्या पाण्यातील मासेमारी असे दोन वेगवेगळे भाग आहेत. या दोन्हीमध्ये उत्पादन वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कशा प्रकारे नियोजन करता येईल याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्याला ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. या किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी सध्या ड्रोनचा वापर केला जात आहे. त्यातून जमा झालेल्या माहितीचा वापर करून सागरी सुरक्षा आणखी बळकट करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करता येईल या विषयी विद्यार्थ्यांनी विचार करावा तसेच विभाग स्वयंपूर्ण करणे, विभागाचा महसूल वाढवणे, मत्स्य व्यवसायातील, बंदरांच्या विकासातील अडचणी सोडवणे, अंमबजावणीमध्ये असलेल्या काही त्रुटींची पूर्तता करणे, विभागाचा संपूर्ण कारभार पारदर्शक करणे यासह अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढवून विभागाचे कामकाज आणखी प्रभावीपणे करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करणे याविषयीही सविस्तर सादरीकरण विद्यार्थ्यांनी तयार करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पारंपरिक मच्छीमार आणि पर्ससिन मच्छीमार असा एक फरक असला तरी राज्यातील किनारपट्टीच्या प्रत्येक जिल्ह्यात मासेमारीच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. त्यामुळे एकाच पद्धतीची योजना किंवा व्यवस्था सर्वच जिल्ह्यांमध्ये लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही, तर प्रत्येक जिल्ह्याची वेगवेगळी गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे एआय तंत्रज्ञानाची प्रणाली विकसित करण्यात यावी, असेही मंत्री राणे म्हणाले.

विद्यार्थ्यांनी सुरक्षा व उत्पादन वाढीसाठी एआयच्या माध्यमातून करावयाच्या संकल्पना सुचविल्या.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई साकारणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्यात येणार आहे. ही 'इनोव्हेशन सिटी' देशातील सर्वात प्रगत शहरांपैकी एक ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी ॲण्ड लीडरशिप समिट कार्यक्रमात बोलत होते.



तीनशे एकरमध्ये इनोव्हेशन सिटी सिटी विकसित केली जाणार असून या सिटीमध्ये तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर भर दिला जाणार आहे तसेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथे जीसीसी पार्क विकसित करणार आहोत. यासाठी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपल्या कल्पना आणि योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी केले.

**एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व महाराष्ट्र करेल**

तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच देशाच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात 'एआय' सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारीतून इंडस्ट्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने एक ट्रिलियन डॉलरपर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राज्याने नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला (एमएमआरडी) १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**डेटा सेंटर आणि फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर**

देशातील ६०% डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०% वीजनिर्मिती हरित ऊर्जे वर आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

**नाशिक कुंभमेळा; अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले.

**कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'ॲग्री-स्टॅट' उपक्रमाअंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस आहे.

# माणगावमधील नवीन पोलीस वसाहतीच्या निर्मितीची प्रतीक्षा

## महसूल खात्याच्या जागेचे गृह विभागाकडे हस्तांतरण रखडले

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस ठाण्याच्या इंग्रज सरकारने बांधलेल्या इमारतीला सुमारे १०० वर्ष होवून गेली. त्यावेळेपासून आजतागायत हे पोलीस ठाणे त्याच जागेवर उभे आहे. तर पोलीस ठाण्याजवळ बांधण्यात आलेली कर्मचाऱ्यांची वसाहत जीर्ण झाल्याने ती गेल्या वर्षी मोडून जमीनदोस्त केली. सदर जागा महसूल खात्याच्या नावे असल्याने ती गृह विभागाकडे हस्तांतरण झालेली नसल्याने तेथे बांधकाम करता येत नसल्याने कर्मचाऱ्यांना भाड्याच्या खोलीत राहावे लागत असल्याने पोलीस वसाहतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

माणगाव येथे १९१८-१९मध्ये पोलीस चौकीजवळच ब्रिटीश सरकारने कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उभारले होते. राज्य सरकारने या निवासस्थानाच्या वेळोवेळी दुरुस्त्या केल्या. माणगाव



पोलीस ठाण्यात १९६७ - ६८ मध्ये पोलीस अधिकाऱ्यांसाठी एक निवासस्थान, तर दोन चाळी मध्ये २६ कर्मचारी राहत होते. सन १९८५-८६मध्ये तिसरी चाळ बांधण्यात आली. यात १२ निवासस्थाने बांधण्यात आली होती. त्यात १२ पोलीस कर्मचारी राहत होते. या तिन्ही चाळीचे क्षेत्र ७०८१.४० चौरस मीटर असून ही जागा शासनाची आहे. माणगाव पोलीस ठाणे अंतर्गत १४० गावांचा समावेश आहे. येथे अधिकारी व कर्मचारी मिळून ६८ जण काम करीत आहेत.

सध्या मोडकळीस आलेली निवासस्थाने तोडून जागा मोकळी केली आहे. येथे सर्वसोयींनी युक्त पोलीस ठाण्याची भव्य इमारत व तीन मजली इमारतीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवास उभारण्यात येणार आहे. या इमारतीत ७० कर्मचारी व सहा अधिकाऱ्यांसाठी निवासाची सोय होणार आहे. त्यामुळे माणगाव पोलीस ठाण्याला शंभर वर्षानंतर गृहखात्याकडून सर्वसोयींनीयुक्त देखणी सुसज्ज इमारत उभारली जाणार आहे अशी संकल्पना गृहखात्याच्या विचाराधीन आहे.

# नवी मुंबईत जलाशय व परिसरात विशेष स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्वांगीण स्वच्छतेवर भर देण्यात येत असून विविध मोहीमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' विशेष मोहीम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी राबविण्यात आली.

घणसोली विभागातील राजीव गांधी तलावाप्रमाणेच खैरणे सेक्टर १२ येथील तलाव व त्याच्या परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी वने मंत्री गणेश नाईक यांची विशेष उपस्थिती होती. कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त वसंत मुंडावरे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण ,स्वच्छता निरीक्षक व पर्यवेक्षक आणि स्वच्छताकर्मींनी या मोहीमेत सक्रीय सहभाग घेतला. श्री संत निरंकारी मंडळ यांचे संयोजक मनोहर सावंत व संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी स्वच्छ जल स्वच्छ मन या मोहीमेत सक्रीय सहभागीहोते अशाच प्रकारची मोहीम बेलापूर विभागात ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसरात सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे आणि स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांनी सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह स्वच्छताकर्मींना सोबत घेऊन राबविली. या ठिकाणीही श्री संत निरंकारी मंडळ, बेलापूर नेरुळ शिरवणे यांच्या सदस्यांनी सहभाग घेतला.

वाशी सेक्टर १० येथील मिनी सीशोअर परिसरात विभाग अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त अलका महापूरकर व स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ यांच्या माध्यमातून जलाशय व परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये वाशी विभागातील अधिकारी , कर्मचारी व स्वच्छताकर्मी यांच्यासह श्री संत निरंकारी मंडळांचे सदस्यही मोठया संख्येने सहभागी झाले होते.

घनकचरा व्यवस्थापन विभाग अधिकारी आणि स्वच्छता अधिकारी यांच्या माध्यमातून 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' मोहीमा लोकसहभागातून राबविण्यात आल्या.

# गणेशमूर्तिकारांनी घेतली आमदार महेंद्र दळवी यांची भेट

## पीओपीची बंदी उठवण्यासाठी साकडे

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या वापरावर आलेल्या बंदीच्या अनुषंगाने आज पेण तालुक्यातील हमरापूरच्या गणेश मूर्तिकारानी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेतली. रायगडमधील सर्व आमदार आणि खासदार यांनी एकत्र येऊन यावर मार्ग काढावा अशी विनंती मूर्तिकारानी आमदार दळवी यांना केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी यावर मुख्यमंत्री व इतर संबंधीतांची बैठक घेऊन यावर मार्ग काढण्याचे आश्वासन आमदार दळवी यांनी दिलं.

उच्च न्यायालयाने मुर्तीवर बंदी आणल्यानंतर मुर्तीकार आक्रमक झाले आहेत. राज्यातील मुर्तीकार यामुद्द्यावर एकवटले आहेत. दोनच दिवसांपूर्वी राज्यातील मुर्तीकारांची पेण येथे बैठक झाली. या बैठकीत न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात एल्गार पुकारला. सरकारने यासंदर्भात ठोस भूमिका न्यायालयात मांडावी आणि मूर्तीकारांना दिलासा द्यावा अशी एकमुखी मागणी लावून धरण्यात आली. त्यानंतर आज हमरापूर विभाग गणेश मूर्तीकार उत्कर्ष मंडळाच्या पदाधिकारयांनी आमदार महेंद्र दळवी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेवून आपले गाऱ्हाणे मांडले.

राज्य सरकारने प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून पीओपी बाबत



संशोधन करावे. न्यायालयाचा अंतिम निकाल येत्या २० मार्च रोजी आहे. तत्पूर्वी राज्य सरकारने योग्य ती पावले उचलून पीओपीवरील बंदी कशी उठेल हे पहावे. आतापर्यंत बरयाच गणेशमूर्ती तयार झाल्या आहेत. मुर्तीकारांनी त्यासाठी बँकांकडून कोटयवधी रूपयांचे कर्ज घेतले आहे. त्यांचयावर आत्महत्येची वेळ येईल, ही बाबदेखील मुर्तीकारांनी आपल्या निवेदनातून निदर्शनास आणून दिली आहे.

मुर्तीकारांचे म्हणणे आमदार दळवी यांनी ऐकून घेतल्यानंतर त्यांना दिलासा दिला. हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.पर्याय अवलंबून या मूर्तीकारांना न्याय दिला पाहिजे अशी आमदार म्हणून माझी भूमिका आहे. या व्यवसायाला बाधा निर्माण होणार नाही अशा पदधतीने भूमिका घेतली पाहिजे. आगामी अर्थ संकल्पीय अधिवेशनापूर्वी यावर जिल्हयातील आमदार खासदार एकत्र येवून आपली भूमिका मांडतील आणि मुर्तीकारांना न्याय देतील असा शब्द आमदार महेंद्र दळवी यांनी दिला आहे.


पीओपी मुर्तीवर बंदी घातल्यास राज्यातील लोकांना उत्सव साजरे करणे कठीण होवून बसेल. या व्यवसायावर अवलंबून मुर्तीकार, व्यापारी, वाहतूकदार, मजूर यांचे जीवन उद्ध्वस्त होईल. न्यायालयाच्या निर्णया नंतर मूर्तिकार आणि त्यावर अवलंबून राज्यातील ३६ लाख कुटुंबांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# बैलगाडी-नांगर पारंपारिक पद्धतीने जोपासलेल्या शेतकऱ्यांचा होणार सत्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाशिवरात्री उत्सवानिमित्त बुधवारी (दि .२६) रोजी भुवनेश्वर मंदिर ट्रस्ट, १८ गांव समिती, चिंचवली (नारंगी)तर्फे १८ गावांतील बैलगाडी-नांगर पारंपारिक पध्दतीने जोपासलेल्या शेतकरीबांधवांच्या शेतकरी गौरव सोहळ्याचे आयोजन सकाळी साडेअकरा वाजता नारंगीच्या श्रीक्षेत्र भुवनेश्वर मंदिराच्या आवारात करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाबरोबरच दिवसभर अन्य कार्यक्रमांचेही



आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी सात ते साडेआठया दरम्यान श्री दत्तकृपा प्रसादिक महिला भजन मंडळ, अलिबाग यांचे भजन होईल. सकाळी नऊ ते साडेदहा या दरम्यान कु. मानसी पाटील, भुवनेश्वर नारंगी यांचे भजन होईल. सकाळी ११ वाजता शहीद शूरवीर जवान सुयोग अशोक कांबळे-नारंगी यांना समर्पित गीत राजेंद्र वर्तक फोफेरी आणि विज्ञान मोकल-मांडवखार सादर करतील.

इयत्ता दहावी आणि बारावीत प्रथम व द्वितीय क्रमाकांने आलेल्या विद्यार्थाचा गुणगौरव सोहळा दुपारी १२ वाजता होणार आहे. दुपारी सव्वा वाजता माणकुले येथील जीवन पाटील यांचे भजन होईल. दुपारच्या सत्रात दुपारी दोन वाजता जय भवानी प्रासादिक भजन मंडळ, वैजाली-हाशिवरे यांचे भजन होईल त्यानंतम दुपारी तीन वाजल्यापासून अन्य कार्यक्रम साजरे होणार आहेत. रात्री सात ते आठ या दरम्यान पालखी सोहळा व मिरवणूक पार पडेल.

# पौर्णिमा नाईक यांची कर सहाय्यकपदी निवड



**पनवेल : वार्ताहर**

लहानपणापासून काहीतरी करून दाखवण्याची जिद्द मनात असल्यास ते स्वप्न मोठेपणी नक्कीच साकार होते, याचा प्रत्यय पनवेल तालुक्यातील कोल्ही येथील पोर्णिमा नाईक (वय २७) यांना आला. एमपीएससीची परीक्षा पास झाल्याने कर सहाय्यक पदी त्यांची निवड करण्यात आली. या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे.

पौर्णिमा समीर नाईक ह्यांची महसूल सहाय्यक तसेच कर सहाय्यक अशा दोन्ही पदी त्यांची निवड झाली आहे. त्यांचा जन्म पनवेलमधील वावंजे येथील असून लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची आवड होती. शाळेत वक्तृत्व, क्रिडा स्पर्धामध्ये त्या नेहमी भाग घेत असत. लहानपणी वडिलांचे छत्र हरपल्याने त्यांचा सांभाळ व संपूर्ण शिक्षण मामा भगवान सांगडे आणि मामी रोशनी सांगडे यांनी स्वतःच्या लेकीप्रमाणे केला. या यशात त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे पौर्णिमा यांनी सांगितले. त्यांची आई अंगणवाडी सेविका असून मामी शिक्षिका आहेत. त्यांच्याकडे बघूनच स्वावलंबी होण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्व प्रवासात तिचे पती समीर नाईक तिच्यापाठी उभे होते. २०२३ मध्ये ती कर सहाय्यक पदासाठी पूर्व परीक्षा पात्र ठरली, गरोदर असतानादेखील अभ्यास केला आणि मुख्य परीक्षा पात्र झाली, मुलगा तीन महिन्याचा असताना कौशल्य चाचणी देउन पात्र झाले. त्यानंतर महसूल सहाय्यक आणि कर सहाय्यकपदी ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात दुसरी निवड झाली. यापुढे अभ्यास असाच सुरू ठेवून राज्यसेवेतून पद मिळवण्याचा नक्कीच प्रयत्न करेन, असे पौर्णिमा यांनी सांगितले.

# विजय वडेट्टीवारांचा उरणमध्ये निषेध

## नरेंद्र महाराजांच्या एकेरी उल्लेखामुळे संताप

**उरण : बातमीदार**

विधानसभा निवडणुकीत २०२४मध्ये संघ आणि संघ प्रणित साधू संत यांनी हिंदुत्व वाचविण्यासाठी जनजागरण केले. साधू संत पाठीशी असल्यामुळे महायुतीचा विजय झाला. नरेंद्र महाराज यांचेही सहकार्य लाभले, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका कार्यक्रमादरम्यान मत व्यक्त केले.

या व्यक्तव्यामुळे आता महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेसचे नेते, काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराजांचा एकेरी उल्लेख करत त्यांना अपशब्द बोलत त्यांचा अपमान केला. त्यामुळे संतप्त झालेल्या श्री स्वामी नरेंद्राचार्यांचे शिष्य व भक्त गणांनी संपूर्ण महाराष्ट्रात विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात निषेध आंदोलन केले.उरण मध्ये रात्री ८ वाजता उरण शहरातील पेन्शनर्स पार्क येथे स्व स्वरूप संप्रदाय तालुका उरण जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांच्या माध्यमातून विजय वडेट्टीवार यांचा जाहिर निषेध करण्यात आला.

या वेळी ३५० हुन अधिक भाविक भक्त, शिष्यगण यावेळी उपस्थित होते.




माफी मांगो, माफी मांगो विजय वडेट्टीवार माफी मांगो, हिंदू धर्माचा विजय असो, साधू संताचा अपमान करणाऱ्यांचा जाहीर निषेध, जगद्गुरूंचा अपमान करणाऱ्यांचा जाहीर निषेध अशा शब्दात घोषणा देत विजय वडेट्टीवारांच्या प्रतिमेला जोडे मारत घोषणाबाजी करत या वेळी निषेध करण्यात आला.

या वेळी भाविक भक्त, शिष्यगण आक्रमक झालेले दिसून आले. विजय वडेट्टीवारांनी आपल्या वक्तव्या विषयी जगद्गुरु नरेंद्रचार्यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी यावेळी भाविक भक्त, शिष्य गणांनी केली आहे.

# कामोठे येथे भंगार गोदामाला आग

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीत सेक्टर २३ येथे असलेल्या मोकळ्या भूखंडांवर मोठ्या प्रमाणात भंगारची गोदाम थाटण्यात आली आहेत. रविवारी (दि. २३) रात्री बाराच्या सुमारास अशाच एका गोदामात आग लागली. पनवेल पालिकेच्या अग्निशमन दलातील जवानांच्या अथक प्रयत्नानंतर आग विझवण्यात त्यांना यश आले.

बेकायदेशीरपणे थाटण्यात येणार्या भंगार साठवण्याच्या गोदामांना आग लागण्याच्या घटना नेहमीच घडत असतात. मात्र, घटनेनंतर गोदामात आग विझवण्याची कोणतीच यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे लक्षात येत असते. आशा वेळी अनधिकृतपणे भंगार साठवण्याचा व्यवसाय करणार्या व्यावसायिकांविरोधात प्रशासनाने कठोर कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, हे होत नसल्याने भंगार व्यवसायिकांचे फावले असून, वसाहतीलगतचे मोकळे भूखंड हेरून त्या ठिकाणी गोदाम थाटण्याचा सपाटा व्यवसायिकांनी लावला आहे.



**दुखवटा**

## ताराबाई सकपाळ



**सुधागड :** राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या वावळोली येथील आदर्श शिक्षिका सौ. ताराबाई सकपाळ यांचे २४ फेब्रुवारी रोजी वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या सामाजिक जाणिवा, समाजाप्रती असलेली तळमळ आणि प्रेमळ स्वभावामुळे त्या सर्वांच्या मनात घर करून राहिल्या होत्या. त्यांच्या भाषणातील प्रभुत्व आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन पूर्ण करण्याची वृत्ती यामुळे त्या आदर्श शिक्षिका म्हणून ओळखल्या जात होत्या. आपल्या कार्यकाळात अनेकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले. सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

## निवडक

### पनवेल परिसरात दोघांची आत्महत्या

**पनवेल :** येथील परिसरात राहणाऱ्या दोन व्यक्तींनी वेगवेगळ्या कारणावरुन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. किडनीच्या आजाराला कंटाळून खारघर सेक्टर ३६ येथे राहणाऱ्या संकेत सोनटक्के (वय ४४) वर्षीय व्यक्तीने इमारतीच्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. तर दुसऱ्या घटनेत सोमु यमनू राठोड (वय ३८) असून त्याने अज्ञात कारणावरून घरातील फॅनला टॉवेल, स्कार्फ आणि पॅन्टच्या साह्याने पनवेल तालुक्यातील खेरणे येथील चाळीत गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनांची नोंद खारघर व पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### डम्परच्या धडकेत दुचाकीचालक ठार

**पनवेल :** दुचाकीला पाठीमागून अज्ञात डम्परची धडक लागल्याने मोहम्मद सोहेल अन्सारी या दुचाकी चालकाचा मृत्यू झाला. तर, अन्य एक जण जखमी झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात डम्पर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद अन्सारी हा जेएनपीटी ते पळस्पे महामार्गाने उलवे येथे जात होता. गव्हाण फाटा येथील बेलापूरकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावर हा अपघात झाला.

### बसमध्ये चढताना सोन्याची लगड चोरली

**पनवेल :** बसमध्ये चढताना चोराने व्यावसायिकाच्या खिशातील सोन्याची लगड पळवली. तीन लाख २० हजारांचा ऐवज चोरल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खोपोली येथील संजय प्रधान यांचा सोने विक्रीचा व्यवसाय आहे. ते दागिने बनवण्यासाठी सोन्याची लगड व इतर दागिने घेऊन खोपोली येथील एनएमएमटी बसने पनवेल कापड बाजारात गेले. तेथे त्यांनी दागिने पॉलीश करण्यासाठी दिले. त्यानंतर सोन्याची लगड विकत घेतली आणि दागिने पॉलिश करून जवळ ठेवले. त्यानंतर ते खोपोली येथे जाण्यासाठी पनवेल स्थानकासमोरील बसमध्ये बसले. पळस्पे येथे आल्यावर तिकीट काढण्यासाठी खिशात हात घातला असता लगड चोरीला गेल्याचे समजले.

### रुग्णवाहिकेची कारला धडक

**पनवेल :** रुग्णवाहिकेने एका कारला दिलेल्या धडकेत एक जण जखमी झाला. हा अपघात पनवेल शहरातील गार्डन हॉटेल सिग्नलजवळ झाला. या प्रकरणी रुग्णवाहिका चालक विजय जगताप याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेत मंगेश कांबळे (रा. विद्याविहार) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर रुग्णवाहिकेचा चालक हा पोलिसांना माहिती न देताच पळून गेला आहे. दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** वाहनाने धडक दिल्याने ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. सुग्रीव पुष्प कोल असे मृत तरुणाचे नाव आहे. सुग्रीव हा पहाटे सव्वातीनच्या सुमारास रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेला दिसला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस अधिक तपास करत आहेत.

### तळोजा पोलिसांची बांगलादेशींवर कारवाई

**पनवेल :** तळोजा पोलिसांनी दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई केली. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. मुर्शिदा अख्तर काजल मिया आणि लवली मोनुमिया अशी दोघांची नावे आहेत. तळोजा एमआयडीसी आयजीपीएल बस स्टॉपजवळ बांगलादेशी नागरिक अवैधरीत्या भारतात प्रवेश करून वास्तव्य करण्यास आल्या बाबतची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली. त्यानुसार दोन महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे भारतीय कागदपत्रे मागितली असता ती दिली नाहीत. ते गरिबीला कंटाळून भारतात प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्याकडून दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

### रघुनाथ पाटील यांची नियुक्ती



**पनवेल :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे राज्य उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने तसेच मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या आदेशाने व संजय मोरे व रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांच्या मार्गदर्शनानुसार उरण विधानसभा मतदारसंघातील पनवेल तालुका प्रमुखपदी रघुनाथ मंगल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी रघुनाथ पाटील यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मनोज कडू सेवानिवृत

**उरण :** तालुक्यातील मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन



लिमिटेडचे कामगार मनोज कडू किल्न डिपार्टमेंटमध्ये कामाला होते. त्यांनी ३४ वर्षे प्रदीर्घ सेवेतून शनिवारी (दि.२२) निवृत्त झाले. ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडचे ॲडमीनचे सिनिअर मॅनेजर आय.बी.सिंग यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ देवून मनोज कडू व त्यांची पत्नी यांना सन्मानित करून सत्कार करण्यात आले. श्रमिक सेनेच्या युनियन वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडचे ॲडमीनचे सिनिअर मॅनेजर आय.बी.सिंग, नहीम साहेब, ॲडमीनचे गणपत डाटेकर, श्रमिक सेनेचे अध्यक्ष लक्ष्मन रेवने, संदीप राऊत, डॉ.नयना म्हात्रे, जावई जयेश मढवी, दामोदर ठोंबरे, जगदीश पाटील व कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल मनपा हद्दीतील विकासकामांना गती

## आयुक्तांकडून आढावा; संबंधित विभागांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा विभागवार आढावा आज दिनांक २४ फेब्रुवारी रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी घेतला. या वेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचन संबधित विभागास दिल्या.



या आढावा बैठकीत बांधकाम विभागाच्या वतीने महापालिका हद्दीत सुरू असलेल्या विविध कामांच्या प्रगती बाबत माहिती घेण्यात आली. तसेच नव्याने होऊ घातलेले महापालिका हद्दीतील कामे जसे की सर्व स्मशानभूमी सुधारणा, विविध ठिकाणच्या शाळा बांधणे, दुरूस्ती करणे, हिरकणी रूग्णालय या कामाबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.

महापालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी शौचालय उभारण्यास्तव जागेची पाहणी करण्याबाबत आरोग्य विभागास सूचना दिल्या. तसेच अग्निशमन विभाग, नगररचना, दिव्यांग,पाणीपुरवठा, विद्युत विभागाच्या विविध कामांचा आढावा घेऊन त्यावरती या वेळी चर्चा करण्यात आली.

तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर लावताना त्यावरती क्यू आर कोड लावणे बंधनकारक आहे. ज्या होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती क्यू आर कोड नाहीत असे होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती तात्काळ तोडक कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना नोटीस देऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयुक्तांनी यावेळी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक संचालक केशव शिंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, डॉ.रूपाली माने, सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : तालुक्यातील वलप येथील अंतरा कैलास पाटील हिने फायर ॲण्ड सेफ्टी इंजिनिअरींगमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अंतराचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी कैलास पाटील उपस्थित होते.**

# वाहन चोरीप्रकरणी तिघे गजाआड; कामोठे पोलिसांनी केली वाहने हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरात चोरी झालेल्या चार चाकी वाहनांपैकी सहा वाहने हस्तगत करण्यात आली असून या प्रकरणी तीन जणांना गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे.





कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहन चोरी संदर्भातील गुन्हे दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांचे मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील उपनिरीक्षक किरण राऊत, हवालदार संजय झोळ, नाईक सचिन ठोंबरे, शिपाई प्रमोद कोकाटे, नितीन गायकवाड आदींनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपींची माहिती काढून त्यामध्ये मोहम्मद शाहिद मिर्झा बेग, (वय ४१), मोहम्मद फैज अकबर शेख, (वय ४८), अजीज रशीद खान, (वय ४८) यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून गुन्ह्यातील दोन स्वीफ्ट व एक इर्टीगा ताब्यात घेण्यात आली असून सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत.

आरोपी हे सराईत असून त्यांच्यावर कामोठे, बोरीवली, वागळे पोलीस ठाणे आदी ठिकाणी वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. यांच्या अटकेमुळे अजूनही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# मोहोपाडा येथील आदिवासी बांधवांचे घराचे स्वप्न साकार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पंतप्रधान आवास योजनेच्या ग्रामीण टप्पा-दोनमध्ये राज्यात २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र, तर १० लाख लाभार्थ्यांना घरकुलासाठी प्रथम हप्ता वितरण करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झाला. या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात पाच लाभार्थ्यांना मंजुरीपत्र अमित शाह यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यासाठी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या सभागृहात चित्रफित लावण्यात आली होती.



या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते. राज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा १ अंतर्गत मागील सात वर्षांत १३,५७,५६४ उद्दिष्टे होते. त्या तुलनेत सन २०२४-२५ या एका

वर्षामध्ये टप्पा २ अंतर्गत महाराष्ट्र राज्याला २० लाख घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त झाले. सन २०२४-२५मध्ये मंजूर झालेल्या घरकुलाच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी स्वतःची जागा उपलब्ध नसेल तर पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत ५०० चौरस फुट जागेसाठी प्रति लाभार्थी एक लाख रुपये जागा खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. २० लाख घरकुल मंजुरीचे आदेश २८ हजार ग्रामपंचायतीमध्ये एकाच दिवशी वाटप करण्यात येत आहे.

दरम्यान, वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील ४८ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनचा लाभ मिळाला आहे. याबाबतचे मंजुरी पत्र भिम पवार यांना सरपंच उमाताई संदिप मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील ,पंचायत समिती शाखा अभियंता अनिल जाधव यांच्याहस्ते प्रथम हप्ता वितरण करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.







**पनवेल : भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ललिता इनकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि वर्षा ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेत्या विद्या तामखडे, अमोल जाधव आदी उपस्थित होते.**

# केएलई महाविद्यालयात वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील केएलई महाविद्यालयामध्ये शनिवारी (दि.२२) वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार केएलई महाविद्यालयामध्ये वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या वेळी पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये धाडसी वृत्ती निर्माण व्हावी, पर्यावरणीय विषयांचे महत्व समजावे यासाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच त्याचबरोबर 'पर्यावरणीय समस्या' या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी पर्यावरण विभागाचे प्रमुख मनोज चव्हाण उपस्थित होते. केएलई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय डी.मेनधुलकर व प्राध्यापक शितल घारगे, प्राध्यापक विशाल छावरिया यांचे सहकार्य लाभले.



**मुंबई : मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील बाल कलाकार अर्जुनी सस्ते हिची भाजप ओबीसी मोर्चा सोशल मीडिया रायगड जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते यांनी भेट घेतली. सोबत आणि पटकथा लेखक, दिग्दर्शक वसंत इंगोले.**

# उरणमध्ये संत रोहिदास महाराज जयंती साजरी; महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

भारतातील थोर समाज सुधारक, संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती गुरु रविदास सामाजिक विकास संस्था उरण यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, उरण शहर येथे मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.





कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ सल्लागार रामचंद्र लोखंडे यांनी केले तर समाजसेवक तथा उद्योगपती अतुल चांदोरकर यांनी दिपप्रज्वलन केले. गुरु रविदास सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब अवसरे यांनी प्रतिमापूजन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना जितेंद्र केळकर यांनी केले. संस्थेचे कार्याध्यक्ष दशरथभाऊ चव्हाण, उपाध्यक्ष गणेश जळगावकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संत शिरोमणी गुरु रविदास यांनी समाजातील वाईट रूढी, वाईट परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान कशा प्रकारे दूर केल्या, समाज प्रबोधन कशा प्रकारे केले याची माहिती उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दिली. तदनंतर महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम मोठया उत्साहात झाला. एकंदरीत उरणमध्ये संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांची जयंती उत्सव व महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात उत्तम प्रतिसादात झाला.

सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु रविदास सामाजिक विकास संस्था उरणचे अध्यक्ष बाळासाहेब अवसरे, कार्याध्यक्ष दशरथ चव्हाण, उपाध्यक्ष गणेश जळगावकर, उपाध्यक्ष अतुल चांदोरकर, सचिव जितेंद्र केळकर, सहसचिव अर्जुन साबळे, खजिनदार नरेंद्र काकडे, सहखजिनदार सागर नाचणकर, सल्लागार अशोक ताचतोडे, किशोर खुणे, संदीप चव्हाण, भगवान देवरे, रामचंद्र लोखंडे, प्रविणकुमार वसईकर, समीर केळकर यांच्यासह सर्वच पदाधिकारी सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## संपादकीय

# राजकारणासाठी हिंदीविरोध

तामिळनाडूत हिंदीविरोध नवीन नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून तेथे हिंदीकडे 'तमिळ संस्कृतीला धोका' अशा दृष्टीनेच पाहिले गेले आहे. आता अवघा देश नवे शैक्षणिक धोरण स्वीकारून प्रगतीच्या दिशेने जात असताना हिंदीविरोधाच्या नावाखाली तामिळनाडूतील राज्यकर्ते राज्यातील विद्यार्थ्यांना त्यापासून दूर का बरे ठेवत असावेत?

**हिंदीविरोध हा गेली अनेक दशके तामिळनाडूतील राजकारणाचा मोठा भाग होऊन बसला आहे. १९३८ साली तत्कालीन मद्रास प्रांतात सरकारी पातळीवरून हिंदी शिकवण्याचा निर्णय झाला असता नेते पेरियार यांनी त्याविरोधात आंदोलन पुकारले. १९३९ साली हिंदीविरोधी आंदोलनातील हिंसाचारात दोघांचा बळीही गेला. पेरियार, अण्णा दुराई आदी नेतेमंडळींनी घेतलेली हिंदीविरोधाची कट्टर भूमिका स्थानिक राजकारणात आजतागायत कायम आहे. केंद्रातील काँग्रेस राजवटीच्या काळातही तामिळनाडूत हिंदीच्या शिक्षणाचे प्रयत्न झाले. आता केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार असतानाही तसेच प्रयत्न सुरू आहेत. तमिळनाडू कदापिही त्रिभाषा सूत्र स्वीकारणार नाही अशी भूमिका १९७०च्या दशकात तत्कालीन मुख्यमंत्री अण्णा दुराई यांनी जाहीर केली होती. तामिळनाडूतील राज्यकर्ते आजही त्याच भूमिकेवर ठाम असून तामिळनाडू कधीही हिंदी स्वीकारणार नाही असे वक्तव्य तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी अलीकडेच केले. तेथील सत्ताधाऱ्यांचा हा हिंदीविरोध नेमका कशासाठी आहे? आपले राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ते या भूमिकेचा वापर करत आहेत का, असा प्रश्न कुणाही सुज्ञ व्यक्तीला पडावा. वास्तविक नव्या शैक्षणिक धोरणामुळे कोणत्याही विशिष्ट भाषेची सक्ती केली जाणार नाही. उलट विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार हवी ती भाषा निवडण्याचे पर्याय उपलब्ध होणार आहेत. मग असे असताना तामिळनाडूतील राजकारणी हिंदी आपल्यावर लादली जाते आहे असा गैरसमज सर्वसामान्यांमध्ये का पसरवत असावेत? नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे देशातील शिक्षण प्रणाली ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाशी मिळतीजुळती होणार आहे. केंद्र सरकारने तामिळनाडूच्या विकासासाठी दहा हजार कोटी रूपये दिले तरीही आपले सरकार नवे शैक्षणिक धोरण स्वीकारणार नाही अशी आडमुठेपणाची भूमिका मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आता घेतली आहे. नव्या शैक्षणिक धोरणाला असलेला विरोध हा केवळ हिंदी लादण्याच्या मुद्यावरून नसून इतर अनेक कारणेही या भूमिकेमागे आहेत असा पवित्राही त्यांनी आता घेतला आहे. केंद्राला आव्हान देण्याच्या आपल्या धोरणामुळे राज्यातील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर काय परिणाम होतील याचा कुठलाही विचार त्यांनी केलेला दिसत नाही. नवे शैक्षणिक धोरण तामिळनाडूतील विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर नेईल. या धोरणामुळे राज्यातील अनुसूचित जातीजमातींच्या विद्यार्थ्यांना सध्या दिली जात असलेली आर्थिक मदत बंद होईल अशी भीती पसरवण्याचे कारस्थानही तेथे केले जात आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिल्यास तामिळनाडू राज्य दोन हजार वर्षे मागे ढकलले जाईल असे बिनबुडाचे आरोप करून केंद्राच्या विरोधात भूमिका घेण्याचे नेहमीचेच राजकारण स्टॅलिन साधत आहेत. प्रादेशिक अस्मितेच्या या मुद्यावर तामिळनाडूतील भाजप वगळता सारेच पक्ष एकवटले आहेत. लोकप्रिय अभिनेते व आता राजकीय नेतेही बनलेले कमल हसन हेही या वादात मैदानात उतरले असून तमिळसाठी येथील लोकांनी जीव गमावला आहे हे विसरता कामा नये असे भावनिक आव्हान त्यांनी केले आहे. या अशा भूमिकेतून राज्यातील विद्यार्थ्यांना आपण नव्या संधी नाकारत आहोत याचे भान या नेतेमंडळींना कधी येणार कुणास ठाऊक?**

# मराठी भाषेचा वापर वाढवावा...




आपल्या मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला आणि याच पार्श्वभूमीवर, माय मराठीचा जागर करण्यासाठी ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत संपन्न झाले. प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद अशी ही बाब आहे. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय आहे, याचा प्रत्यय आपणास या ऐतिहासिक संमेलनातून आला आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ यानिमित्ताने महाराष्ट्र वा देशातीलच नव्हे, अवघ्या जगातील साहित्य रसिकांनी देशाच्या राजधानीत अनुभवला.

या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले. या संमेलनासाठी मराठी सारस्वतांची मांदियाळी दिल्लीत जमली देश व विदेशातील साहित्य रसिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते . भारतीय भाषांमध्ये कधीही वैरभाव नाही. भाषांनी नेहमीच एकमेकांवर प्रभाव टाकला आहे आणि समृद्ध केले आहे.अनेकदा, जेव्हा भाषेच्या आधारावर विभागणी करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा आपला सामायिक भाषिक वारसा जोरदार प्रतिवाद प्रदान करतो. या सर्व समाजाशी दुरावण्याची आणि समृद्धीची जबाबदारी स्वीकारण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळेच आज आपण मराठीसह सर्व प्रमुख भाषांमध्ये शिक्षणाचा प्रसार करत आहोत, ही मानसिकता मराठीच्या कमतरतेमुळे बदलली आहे. देशात साहित्याला खूप महत्त्व आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनावेळी म्हणाले ते खरेच आहे.

भाषा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भाषेशिवाय आपल्याला जगताच येणार नाही. मग ती भाषा शब्दांची असो, डोळ्यांची असो किंवा हावभावांची असो.तिच्याद्वारेच आपण आपल्या भावना, विचार व्यक्त करत असतो. या भाषेत मातृभाषेला जास्त महत्त्व आहे. भाषा माणसाने निर्माण केली. तिला चिन्ह, त्याला अर्थ माणसांनी दिले. त्यामुळे हजारो भाषा निर्माण झाल्या. त्यातील एक भाषा म्हणजे आपली मराठी. तिला २००० वर्षांचा इतिहास आहे. तिच्यातील शिलालेख, ताम्रपट, लिखित साहित्य आजही उपलब्ध आहे. संत ज्ञानेश्वरांनी तिची तुलना अमृताची करून तिला अमृता पेक्षा सरस आणि मधुर ठरवलेले आहे आणि त्यामुळेच या भाषेचं वेगळेपण आपण लक्षात घेतलं पाहिजे. भाषा आपल्याला आईसारखीच असते. मराठी इतकी समृद्ध भाषा फार कमी आहेत. मराठीचे वेगळेपण अनेक प्रकारे सिद्ध करता येते.

मराठी भाषेत जवळजवळ ४८ काव्याचे प्रकार आहेत. ज्या भाषेत आपल्या सगळ्या भावना विचार नेमकेपणाने व्यक्त करता येतात ती भाषा समृद्ध मानली जाते. मराठी अशी समृद्ध भाषा आहे. अगदी एखाद्या क्रियापदाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने केला तर त्याचा अर्थ बदलत जातो उदाहरणार्थ भरणे.. या क्रियापदाचा वापर जसा तुम्ही कराल तसा त्याचा अर्थ बदलत जातो. नळाचे पाणी भरणे, मनात एखादी व्यक्ती भरणे, कान भरणे, लक्ष्मी पाणी भरणे, जखम भरणे, अंगाने भरणे, वगैरे वगैरे.. प्रत्येक भरण्याचा अर्थ वेगळा अर्थच्छटा वेगळ्या. मराठी भाषेला काना, मात्रा, वेलांटी, स्वल्पविराम, पूर्णविराम अशी अनेक चिन्हे आहेत. यांच्या माध्यमातून ती भाषा अधिक सुंदर दिसते. मराठी भाषा संपन्न व समृद्ध आहे पण दुर्दैवाने आज मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषा महत्त्वाची ठरत आहे.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यामुळे आपण मुलांचे किती नुकसान करत आहोत हे आज आपल्या लक्षात येणार नाही. एक तरी भाषा परिपूर्णरित्या आली तर दुसऱ्या भाषा पटकन शिकता येतात. अलीकडे मुलांचे एकाही भाषेवर प्रभुत्व नसते .त्यामुळे त्यांना आपल्या भावना, विचार व्यक्त करताना नेमके शब्द सापडत नाहीत. हा अनुभव आहे. इंग्रजीमध्ये बोलले म्हणजे आपल्याला कोणीतरी मोठे असल्यासारखे वाटते. पण भाषा ही ऐकून येत असते. घरात वेगळी भाषा, शाळेत वेगळी भाषा, समाजात वेगळी भाषा. असे असेल तर त्या मुलांना कोणत्याही एका भाषेत नीटपणे आपले विचार व्यक्त करता येत नाहीत. उलट आपली जी मातृभाषा असते त्यातच आपण जर शिकलो तर आपल्याला भविष्यात कुठेही अडचण येत नाही. इंग्रजी भाषा फक्त अगदी उच्च पदावर असणाऱ्या व परदेशी जाणाऱ्या व्यक्तींनाच उपयोगी पडू शकते. उलट मातृभाषेबरोबर प्रादेशिक भाषा जरी शिकल्या तर त्याचा जास्त उपयोग होईल. आपले म्हणणे जर योग्य रीतीने मांडता आले नाही तर त्या व्यक्तीची घुसमट होते. अशा मुली, मुले आत्मकेंद्री व एकलकोंडी होतात. ते चार लोकांत मिसळू शकत नाहीत .त्याचा परिणाम त्यांच्या करिअरवरही होतो. मराठी भाषा इंग्रजी पेक्षा निश्चितच संपन्न व समृद्ध आहे. या भाषेचं वेगळेपण अनेक बाबतीत आहे. त्यामुळे मराठीचे सौंदर्य अधिक खुलून दिसते.

आपली मराठी भाषा आपणच टिकवली पाहिजे. त्यात आवर्जून बोलले पाहिजे. त्यातील भाषिक सौंदर्याचा लाभ घेतला पाहिजे. मराठीतील म्हणी, वाक्प्रचार अतिशय सुंदर आहेत. मराठी भाषेची विशेषणे सुद्धा खूप छान आहेत. उदा. लुसलुशीत पोळी, खुसखुशीत करंजी, ठणठणीत तब्येत , चटपटीत मिसळ, गुटगुटीत बाळ, चुणचुणीत मुलगी.. असे कितीतरी विशेषणे सांगता येतील.

मराठी भाषेचा उपयोग रोजच्या व्यवहारात सुंदर रीतीने केला पाहिजे.... मोबाईलमुळे किंवा मीडियामुळे प्रमाण भाषेचा वापर होत आहे.. परंतु तोही शुद्ध स्वरूपात नाही.. कारण इंग्रजी व हिंदी भाषेचा प्रभाव येणाऱ्या पिढीवर अधिक होत आहे..त्यामुळे मराठीचे मराठीपण टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवरच आहे. यासाठी मराठीतील साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत कसे जाईल आणि मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल, याचाच विचार करण्याची गरज आहे.. माहिती जनसंपर्क कार्यालय याविषयी जनजागृती करत आहे, ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे.. प्रत्येकानेच आपली भाषा जिवंत ठेवण्यासाठी त्याच भाषेत बोलले पाहिजे. लिहिले पाहिजे आणि त्या भाषेतील साहित्य वाचले पाहिजे.. भाषेत सतत परिवर्तन होतच असते. नवीन शब्द येतच असतात. पण सगळेच नवीन न स्वीकारता काही जुने शब्द, त्यातील गोडवा ही आपण जाणीवपूर्वक जपला पाहिजे.. मराठी भाषेचा वापर वाढवला पाहिजे तसा संकल्प आपण सगळेच करू यात..

– **प्रा. डॉ. श्रुती वडगबाळकर,** सोलापूर



## बदलते तंत्रज्ञान

# गूगलकडून सुविधा शुल्क आकारण्यास सुरुवात?

सध्या सगळीकडेच ऑनलाइन पेमेंट केलं जातं. त्यात अनेक ऑफिस, रेल्वेस्थानक, मेट्रो स्टेशन असो किंवा साधं भाजीचं दुकान असो सगळीकडे ऑनलाइन पेमेंट केलं जातं. त्यात आता आपण थेट सगळी बिलंही ऑनलाइन भरतो. आपल्यापैकीच अनेक लोक बिलं भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात गूगल पे वापरतात. तुम्हीही बिलं भरायला गूगल पे वापरता का? 'गूगल पे'नं वापरकर्त्यांना मोठा दणका दिला आहे.




घरबसल्या आपल्याला ऑनलाइन झटपट बिल भरता येतंय, त्यामुळे व्यवहार अगदी सोपे झालेत. सुरुवातीला हे पेमेंट अगदी मोफत व्हायचं, पण अलीकडे सुविधा शुल्क आकारण्यात येत आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा भुर्दंड बसतोय. यूपीआयपासून बिल पेमेंटपर्यंत विविध सेवा देणाऱ्या ॲप्समुळे आता ग्राहकांवर ओझे वाढू लागलंय. बिल पेमेंटसाठी प्रत्येकाने सुविधा शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, आता यामध्ये गूगल पेदेखील मागे राहिलं नाही, कारण आता गूगलने वापरकर्त्यांकडून सुविधा शुल्क आकारण्यास सुरुवात केलीय. त्यामुळे आता ग्राहकांनी गूगल पेद्वारे पेमेंट केल्यास त्यांना सेवा शुल्क भरावं लागणार असल्याचं समोर येतंय. UPI प्लॅटफॉर्म GPayकडून या प्रकरणावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही आणि अद्याप याविषयी अधिकृत पुष्टी केलेली नाही.

इकॉनॉमिक टाइम्सच्या वृत्तानुसार जर तुम्ही बिल पेमेंटसाठी क्रेडिट किंवा डेबिट कार्ड वापरत असाल तर तुमच्यावर ०.५ टक्के ते १ टक्के शुल्क आकारले जाईल. या शुल्काव्यतिरिक्त तुम्हाला जीएसटीदेखील भरावा लागेल. आतापर्यंत गूगल पेने बिल पेमेंटसाठी वापरकर्त्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले नव्हते. सध्या, गूगल पेने सुविधा शुल्काबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

अहवालात नमूद केलंय की, गेल्या एका वर्षापासून गूगल पे त्यांच्या वापरकर्त्यांकडून मोबाइल शुल्कावर तीन रुपये सुविधा शुल्क आकारत आहे. अहवालात असंही म्हटलंय की, जेव्हा एखाद्या ग्राहकाने वीज बिल भरण्यासाठी क्रेडिट कार्डचा वापर केला, तेव्हा ॲपने वापरकर्त्याकडून १५ रुपये सुविधा शुल्क आकारले. हे शुल्क ॲपमध्ये डेबिट, क्रेडिट कार्ड व्यवहारांसाठी प्रक्रिया शुल्क या नावाने दाखवले जात आहे, यामध्ये जीएसटीदेखील समाविष्ट आहे.

# लेखिका गिरिजाबाई केळकर

## निमित्त

स्त्रीजीवनातील समस्या, तिची दु:खे मांडणार्या पहिल्या गद्य लेखिकांपैकी एक म्हणून महत्त्वाच्या ठरलेल्या गिरीजाबाई केळकर यांचा जन्म १६ ऑक्टोबर १८८६मध्ये मुंबईला झाला. त्यांचे माहेरचे नाव द्रौपदी बर्वे होते. त्यांचे वडील बर्वे यांची नोकरी सौराष्ट्रात असल्याने द्रौपदीचे बालपण व शिक्षण गुजरातमध्ये झाले, परंतु न. चिं. केळकर यांचे धाकटे बंधू महादेवराव केळकरांशी द्रौपदीचा विवाह १९०१ साली झाला. त्या गिरीजा महादेव केळकर झाल्या व महाराष्ट्रात आल्या. विवाहानंतर त्या मराठी भाषा शिकल्या व मराठीत त्यांनी प्राविण्य संपादन केले. केळकरांच्या घरच्यांनी गिरीजाबाईंच्या लेखनाला प्रोत्साहन दिल्यामुळे त्या लिहू लागल्या. त्यांनी विपुल व विविध लेखन करून चांगली मान्यता मिळवलीच, शिवाय उत्तम वक्त्या म्हणूनही लौकिक संपादन केला.



गिरीजाबाईंनी १९३१मध्ये लिहिलेल्या 'संसार सोपान' ह्या पुस्तकाच्या प्रास्ताविक प्रकरणाचा आरंभ 'गृहिणी गृहाची शोभा। गृहिणी सुखाचा गाभा। गृहिणी आनंदाचा ठेवा। ऐशी गृहिणी लाभे तो भाग्यवंत देवा।।' या हृद्य काव्यपंक्तींनी केला आहे. त्यांच्या कथा–नाटकांतले अनुभवाचे विश्व रोजच्या जीवनातले व कौटुंबिक आणि घरगुती स्वरूपाचे आहे. नव्या–जुन्याचा संगम माणसाला पुढे नेतो, अशी त्यांची धारणा होती. त्याचबरोबर सुगृहिणी व सुगरण बनविण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. शरीरसंवर्धन व पोषण अन्नावर अवलंबून असते, असे प्रतिपादन करून त्या म्हणतात, 'ज्या सॅनिटेशनच्या नावाने तुम्ही इतके ओरडता, त्या सॅनिटेशनच्या तत्त्वावर रचलेली आमची हिंदू राहणी आहे.' संसारी स्त्रियांना मार्गदर्शक व बोधपर असे विपुल स्फुट लेखनही गिरीजाबाईंनी केले आहे. 'नाही निर्मळ जीवन काय करील साबण?' असे त्या मार्मिकपणे विचारतात.

जुन्यातले चांगले ते जोपासण्याकडे गिरीजाबाईंची वृत्ती दिसते. त्यांची एकंदर वृत्ती सात्त्विक आहे, हे त्यांच्या लिखाणातून जाणवते. त्यांच्या लेखनगुणांत उत्तरोत्तर वाढ झाली व तत्कालीन संस्कारशील मध्यमवर्गीयांचे प्रातिनिधिक ठरू शकेल, असे लेखन त्यांनी केले. 'मनोरंजन', 'ज्ञानप्रकाश', 'खानदेश वैभव' इत्यादी नियतकालिकांतून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले. 'पुस्तकी शीक नि व्यवहाराची भीक' (१९१४), 'पुरी हौस फिटली' (१९१६) या कादंबर्या; 'अंगठीचा प्रभाव' (१९२७) ही दीर्घ सामाजिक कथा; 'स्वभावचित्रे', भाग १ (१९२३), भाग २ (१९३४), 'केवळ विश्रांतीसाठी' (१९२६) कथासंग्रह; 'पुरुषाचे बंड' (१९१३), 'आयेषा' (१९२१), 'राजकुंवर' (शिरकाणाचा सूड) (१९४१), 'हीच मुलीची आई' (१९३२), 'मंदोदरी' (१९५७) ही नाटके त्यांनी लिहिली. त्यांच्या काही पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या, त्यांचे 'द्रौपदीची थाळी' (१९५९) हे आत्मवृत्त असून स्त्री–शिक्षणाचे महत्त्व सांगणारे आणि पतिपरायण संसारी स्त्रीचे साधेसुधे जिव्हाळ्याने भरलेले हे आत्मनिवेदन आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे १९२८ साली मुंबईत भरलेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद गिरीजाबाईंना देऊन त्यांचागौरव करण्यात आला होता.अशा या महान लेखिकेचे निधन २५ फेब्रुवारी १९८० रोजी झाले.

**–वि. ग. जोशी**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुरटी ठेवते तोंडाचे आरोग्य चांगले

तुरटी जवळजवळ प्रत्येक घरात सहज आढळते. तुरटीचा वापर प्रामुख्याने पाणी शुद्धीकरण, सौंदर्यप्रसाधने, वैयक्तिक स्वच्छता आधारित उत्पादने आणि अन्न जतन करण्यासाठी केला जातो. याशिवाय, तुरटी त्वचेला निरोगी बनवते आणि किरकोळ दुखापतींमुळे होणारा रक्तस्त्राव थांबवण्यास मदत करते.



तुरटीमध्ये दाहक–विरोधी आणि अँटी–ऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे जखमा बरे करण्यास मदत करतात. तथापि, तुरटी फक्त शरीराच्या बाह्य भागांवरच वापरली जाऊ शकते.

माउथवॉशसाठी तुरटी वापरणे फायदेशीर आहे. त्यात असलेले अँटीमायक्रोबियल गुणधर्म डेंटल प्लेक तयार होण्यास प्रतिबंध करतात. डेंटल प्लेक म्हणजे दातांवर असलेले बॅक्टेरियाचे चिकट थर.

तुरटी स्फटिकाच्या स्वरूपात असो किंवा पावडरच्या स्वरूपात, ती अनेक गुणधर्मांनी समृद्ध असते. त्यात अँटीपर्स्पिरंट गुणधर्म आहेत, जे घाम नियंत्रित करण्यास मदत करतात. टूथपेस्टमध्येही तुरटीचा वापर केला जातो, कारण ते दात मजबूत करण्यास, तोंडाची दुर्गंधी दूर करण्यास आणि हिरड्यांची सूज कमी करण्यास मदत करते. हे नैसर्गिक अँटीसेप्टिक म्हणून काम करते.

तुरटी वापरण्याचे अनेक फायदे आहेत. त्याच वेळी, त्याचे काही संभाव्य दुष्परिणाम देखील आहेत. जसे की–

संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांना जळजळ आणि खाज येऊ शकते. तुरटी पावडर डोळ्यांत गेल्यास जळजळ होऊ शकते. तुरटीच्या वासामुळे श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात. तुरटी गिळल्याने मळमळ, उलट्या आणि इतर पचन समस्या उद्भवू शकतात.

तुरटीच्या सुरक्षित आणि प्रभावी वापरासाठी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. तुरटीचा दररोज वापर टाळावा. आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच त्वचेवर ते वापरणे चांगले.


तुरटी त्वचेसाठी सुरक्षित आहे. हे त्वचेला घट्टपणा आणते आणि मुरुम आणि डाग कमी करते. तथापि, त्याचा जास्त वापर केल्याने चेहऱ्यावर कोरडेपणा आणि जळजळ होऊ शकते.दाढी केल्यानंतर तुरटी लावणे अगदी योग्य आहे, कारण त्यात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे संसर्गापासून संरक्षण करतात.

# रायगडातील ११ तालुक्यांच्या मुख्यालय ठिकाणी भूमिगत विद्युत वाहिनी टाकणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणात नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान कमी करण्यासाठी कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत रायगड जिल्ह्यात एक हजार १० कोटी ९० लाख रुपयांची कामे करण्यात येणार आहेत तसेच जिल्ह्यातील ११ तालुक्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यात येणार आहे.

कोकणात पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती येते. त्याचबरोबर मागील काही वर्षात निसर्ग, फयान, निसार, तौक्ते या वादळांमुळे मोठी हानी झाली. नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान कमी करण्यासाठी कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी तीन हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले.



त्यातील रायगड जिल्ह्यासाठी एक हजार १० कोटी ९० लाख रुपयांची कामे मंजूर करण्यात आली. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच या कामांना सुरुवात केली जाणार आहे.

भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासाठी ६९९ कोटी ६८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. अलिबागमध्ये काम सुरू आहे. याच तालुक्यात दुसऱ्या टप्प्यातील कामे केली जाणार आहेत. महाड, म्हसळा, पेण, पोलादपूर, मुरूड, रोहा, तळा, उरण, श्रीवर्धन तालुका मुख्यालय व इतर महत्त्वाच्या गावांमध्ये

### कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत विविध कामे

भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यात येणार आहे. लाईफ केअर लि. ही कंपनी हे काम करणार आहे.

१४ जुन्या खारप्रतिबंधक बांधाचे बळकटीकरण करणे करण्यात येणार आहे. खारभूमी विभाग हे काम करणार आहे. १० नवीन समुद्र धूपप्रतिबंधक बांध बांधण्यात येणार असून, चार जुन्या बांधाचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व एमएसआरडीसी ही कामे करणार आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील १०, म्हसळा तालुक्यातील चार, महाड तालुक्यातील १३ व पोलादपूर तालुक्यातील सात गावांमध्ये नवीन बहुद्देशीय निवारा शेड शासकीय जागेमध्ये बांधण्यात येणार आहेत. महाड तालुक्यातील वलंग, करंजखोल येथील जिल्हा परिषदेच्या शाळा इमारतींची दुरूस्ती व अड्राई येथील समाजमंदिराची दुरूस्ती करून बहुद्देशीय निवारा शेड बांधण्यात येणार आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी व मुरूड तालुक्यातील बोर्ली गावांमध्ये निवारा शेड मंजूर आहेत, पण बांधकाम सुरू झाले नसल्याने सुधारित दरसूचीनुसार प्रस्ताव फेर सादर करण्यात आला आहे. अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या २० व मुरूड तालुक्यातील १७ शाळांची दुरूस्ती करण्यात येणार आहे. महाड तालुक्यातील १६ व पोलादपूर तालुक्यातील १२ गावांच्या निवारा शेड खासगी जागेत बांधण्यात येणार आहेत.

# रायगड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेसाठी जमावबंदी लागू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आगामी सण उत्सवाच्या पार्श्व भूमीवर जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात दि. २५ फेब्रुवारीपासून ११ मार्च २०२५ पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत कलम ३७ (१) (३) अन्वये जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यात खालापुर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगांव, महाड, नागोठणे आणि अलिबाग येथे मोठ्या प्रमाणावर औद्योगिक कारखाने आहेत. विविध कामगार संघटनांच्या मागण्यांसाठी अचानक संप, निदर्शने आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हा



निर्णय घेण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार, खोपोली पोलीस ठाणे हद्दीत २५ फेब्रुवारी रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने निदर्शने आणि आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. रोहा पोलीस ठाणे हद्दीत २७ फेब्रुवारी रोजी कोळी महासंघाने सांडपाणी वहिनीवर आंदोलन जाहीर केले आहे.

याशिवाय, २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री, २ मार्च रोजी रमजानचा आरंभ, ८ मार्च रोजी महिला दिन आणि ११ मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनाच्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर हा आदेश लागू करण्यात आला आहे.

हा आदेश अंत्यविधी, शासकीय समारंभ आणि अधिकाऱ्यांच्या कर्तव्यापुरते लागू नाही.


# लोणशी आदिवासीवाडीतील विद्यार्थी झाले आर्थिक साक्षर!

## सर्वांचे बँक डिमॅट अकाउंट उघडण्याचे शिक्षकांचे उद्दिष्ट

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा लोणशी आदिवासी वाडी या शाळेत २१ विद्यार्थी असून या शाळेमध्ये नव्याने सहा महिन्यापूर्वी नियुक्त झालेले मुख्याध्यापक कमलाकर धुळगुंडे हे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सदर शाळेमध्ये विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी




विद्यार्थ्यांच्या घरी शाळा, दररोज सकाळचा नाष्टा, पेन पकडण्यासाठी रब्बर बँडचा वापर, झिरो बजेट प्रोटीन, झिरो बजेट ठिबक सिंचन,डाव्या हाताने लेखन असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदर शिक्षक सतत प्रयत्नशील असतात याच शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे विद्यार्थी बचत बँक सदर उपक्रमांतर्गत २१ विद्यार्थ्यांनी मागच्या ४ महिन्यांमध्ये जवळपास दहा हजाराच्या वर रक्कम शाळेतील बँकेमध्ये जमा केली आहे जमा केलेली रक्कम बँक खाते काढून त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाणार आहे व पुढे या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे डिमॅट अकाउंट काढून सदर रक्कम तज्ञाच्या सल्ल्याने म्युच्युअल फंड किंवा शेअर मार्केटमध्ये गुंतवण्याचे सदर शिक्षकाचे उद्दिष्ट आहे

शिक्षणाचा उद्देश हाच आहे की तो स्वतःच्या पायावर कसा उभा राहिल या शाळेमध्ये पुस्तकी ज्ञाना सोबतच व्यवहारी ज्ञान व पैसे कसे बचत करायचे याकडे कटाक्षाने सदर शिक्षक लक्ष देत आहेत या शाळेत विविध उपक्रम राबवत असल्याबाबत उपविभागीय अधिकारी सानप गटविकास अधिकारी जाधव गटशिक्षणाधिकारी तांबट यांनी सदर उपक्रमाचे कौतुक केले

# महड येथील वरदविनायकाच्या मंदिरात महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशन उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

मंदिर संस्कृतीचे रक्षण, मंदिर हिताच्या दृष्टीने योजना आखणे आणि मंदिरांचे संघटन व्हावे यासाठी श्री अष्टविनायक क्षेत्रापैकी श्री गणपती संस्थान महड येथे विश्वशांती मंगल कार्यालयात महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशन रविवार २३ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. यावेळी जिल्ह्यातील विविध मंदीराचे विश्वस्त, पुजाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

. याप्रसंगी सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक, महाराष्ट्र मंदीर महासंघाचे संघटक संजय जोशी, धर्मदाय अधिन माहिती अभिवक्ता स्वाती दिक्षीत, विविध मंदीर विश्वस्त मंदीर पुजारी उपस्थित होते.



विचारवंत मंडळी एकत्र येतात तेव्हा सुयोग्य, चांगल्या विचाराची देवाणघेवाण होते त्यातून समाजाचे कल्याण होते असे मत श्री गणपती संस्थान महड कार्याध्यक्षा ॲड.मोहिनी वैद्य यांनी व्यक्त केले.

मंदीरांमुळेच धर्म टिकलाय, पंच सुत्रावर कार्य सुरू असल्याचे सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक यांनी सांगत मंदीरासंबंधीच्या अड्चणींची माहिती उपस्थितांसमोर मांडत विस्तृत चर्चा केली.

# मुरूडमध्ये आवक घटल्याने रताळ्यांचा वाढणार 'भाव'

## दोन ते तीन दिवसांत मोठी विक्री होण्याचा अंदाज

**मुरुड : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीला मुरुड शहरात रताळी बाजार सजला असून कोर्लई येथील शेतकरी आपली रताळी विकण्यास सज्ज झाले आहेत. यावर्षी रताळी पिकास दिवस खुप कमी मिळाल्याने रताळी आवक अपेक्षे कमी आहे. आवक घटल्यामुळे रताळी वाजवी किमतीपेक्षा जास्त भावाने विकली जाणार असल्याचा विश्वास शेतकर्यांना वाटतो आहे .

मुरुड तालुक्यातील कोरलई येथील ख्रिश्चन समाज शेती करण्यावर अधिक लक्ष देत असतात.वर्षाचे बारा महिने ते आपल्या शेतात खूप कष्ट घेऊन विविध भाजी पाला पिकवून मुरुड शहरात विकायला घेऊन येत असतात.सुमारे सहा हजार लोकसंख्या असलेली ग्रामपंचायत कोर्लई मध्ये सुमारे दोन हजार पेक्षा जास्त ख्रिश्चन समाजाची वस्ती आहे.येथील ख्रिश्चन समाज भाजी पाला पिकांबरोबर रताळी हे हंगामी पीक घेत असतात.

रताळी पिक घेताना खूप मोठी मेहनत घ्यावी लागते.जमिनीत वाफे खणून रताळीची ताणे वाढवली जातात.या तणांच्या खाली म्हणजेच जमिनी खाली रताळी तयार होत असतात.सध्या कोर्लई येथील शेतकर्यांनी लावलेले रताळी पिक खणण्यास सुरुवात केली आहे.साधारणता महाशिवरात्रीच्या दोन दिवस अगोदर मुरुड शहरातील भाजी मार्केट शेजारी मोठा रताळी बाजार भरतो. कोर्लई येथील शेतकरी पिकवलेली रताळी ट्रक व टेम्पो मधून विकण्यासाठी मुरुड येथील बाजारात विकण्यास येतात.लोक महाशिवरात्र म्हणून उपवासाठी फक्त रताळीचे विविध पदार्थ खाण्यासाठी बनवत असतात.म्हणजेच उपवासाठी रताळ्याची

**रताळी पिक हे अडीच महिन्यात तयार होत असते.हे पीक घेण्यासाठी स्थानिक शेतकरी खूप मेहनत करीत असतात.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मुरुड येथे मोठा रताळी बाजार भरत असतो.यासाठी मुरुड नगरपरिषदेचे मोठे सहकार्य लाभते.महाशिवरात्रीच्या दोन दिवस अगोदरच सर्व शेतकरी बाजारात माल विकण्यास आणतात.लोकांकडून रताळी विकत घेण्यासाठी मोठा प्रतिसाद मिळत आहे**
**–वित्तरिन वेगस, स्थानिक शेतकर**



खीर बनवणे,रताळ्याची खिचडी अथवा भाजी असे विविध प्रकार बनवून ते महाशिवरात्र म्हणून भोजनात वापर करीत असता

मुरुड शहरात रताळी बाजार सजला असून कोर्लई येथील शेतकरी आपला रताळी विकण्यास सज्ज झाले आहेत.सध्याच्या सुरुवातीला रताळीचा भाव हा शंभर रुपये किलो असा लावण्यात आला आहे.रताळीचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे.मोठी रताळी शंभर रुपये, मध्यम आकाराची ८० रुपये,छोटी रताळी ६० रुपये असा दर किलो मागे लावण्यात आला आहे.महाशिवरात्र निमित्त रताळी पिकास मोठी मागणी असते.वर्षातून फक्त एकदाच हे पीक घेतले जाते.त्यामुळे रताळी विकत घेण्यासाठी हिंदू प्रमाणे मुस्लिम ही रताळी घेण्यासाठी गर्दी करीत असतात. दोन ते तीन दिवसात लाखो रुपयांची रताळी विक्री होत असते




**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव**
**ई–निविदा सूचना (तिबार मागणी) क्र. ७ सन २०२४–२५**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, माणगाव यांचेकडून खालील कामाकरिता ई–निविदा सूचना मागविण्यात येत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत **फणसाड प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मुरुड जि. रायगड,** पंपिंग मशिनरीसाठी तरंगता तराफा उभारणी करणे कामाबाबत. कामाची अंदाजित किंमत **रू. १,००,९७,२००/–** कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. २५/०२/२०२५ पासून www. mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : १७/०२/२०२५

**सही/–**
**(एच. आर. नागदे)**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगाव.

आरओसी–२०२४–२५/क्र.–५/सी ६६३९



**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव श्री संत साईबाबा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. केळवणे, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २७/०२/२०२५ ते ०५/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ०६/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. ११/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक ०६/०४/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०२/२०२५

**सही/–**
**(अश्विनी शिंदे)**
निवडणूक निर्णय अधिकारी



GOVERNMENT OF MAHARASHTRA.
HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
**MAHARASHTRA MARITIME BOARD**
Indian Mercantile Chambers, 2nd Floor. Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate. Mumbai - 400 001. Tel.: 022-69041777
Fax: 022-69041740 Website: https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**E-Tender Notice - (Year 2024-25)**

**Main Portal :** https://mahatenders.gov.in
Digitally signed E-Tender for following work is invited by Chief Executive Officer, Maharashtra Maritime Board, Mumbai, from appropriate experienced Project Management Consultant in B1 Tender Form.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Amount in Rs. | Blank Tender form Amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Request for Proposal for Appointment of Project Management Consultancy Services for Construction of Breakwater, Ro-Ro Jetty and Allied facilities at Revdanda Tal. Alibag Dist. Raigad. | 1,50,000/- | 1,180/- |

The details can be viewed online and downloaded directly from the Government of Maharashtra E-Tendering Portal https://mahatenders.gov.in from **25.02.2025 at 15:00 hrs. up to 21.03.2025** at 17:00 (IST).
The right to reject any or all tenders without assigning any reason is reserved.

Date : 24/02/2025

**Sd/-**
**(Sudhir Deore)**
Executive Engineer,
Maharashtra Maritime Board, Mumbai.



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व श्री. प्रितम अनंत पालकर व श्री. महेंद्र अनंत पालकर, राहणार –रा. वेश्वी, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड – ४००७०२ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. सनराईज इन्फ्रा तर्फे भागीदार १) भरत नारनभाई खुंट २) विजय रावजीभाई विराडीया ३) अखिलेश कुमार यादव** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३४९५ | १२.१२.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ३० | ५२० चौ. मी. पैकी २६० चौ. मी. (५०% अविभाज्य हिस्सा) | ०२.०४.२०२४ | १९.०४.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
सिडको/जनसंपर्क/४६७/२०२४-२५

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**



**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड– ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय–०२१९४–२३५७३७, फॅक्स नं. ०२१९४–२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/आरोग्य/ज.हि.या./१७३/२०१०–१६६५/२०२४–२५ दिनांक :– २४/०२/२०२५

**जाहीर सूचना (ध्वनी प्रदूषण बाबत)**

रोहा शहरातील सर्व नागरिक, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांना कळविण्यात येते कि, जनहित याचिका १७३/२०१० चे अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १६ ऑगस्ट २०१६ चे आदेशान्वये रोहा अष्टमी नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम–२००० व Noise Pollution (Regulation and Control) Rule–२०१० ची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. रोहा अष्टमी शहरात ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियमानुसार विविध क्षेत्रासाठी ध्वनीची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे तसेच याबाबत प्राप्त तक्रार प्रणाली तयार करण्यात आली असून सदर कामी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| क्षेत्र | ध्वनीची मर्यादा | | नोडल अधिकारी यांचा तपशील | तक्रारीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.०० | रात्रीची वेळ (रात्री १०.०० ते सकाळी ६.०० | | |
| औद्योगिक क्षेत्र | 75 dB | 70 dB | नोडल अधिकाऱ्याचे नाव श्री. मनोज प्र. पुलेकर (स्वच्छता निरीक्षक) | फोन नं. ०२१९४–२३५७३७, टोल फ्री क्र.– १८००५९९२४०० वेबसाईट https://mahaulb.in ईमेल– rohanagarpalika@gmail.com SMS & WhatsApp मो. क्र. ८४४६१५२११२ |
| व्यावसायिक क्षेत्र | 65 dB | 55 dB | | |
| रहिवाशी क्षेत्र | 55 dB | 45 dB | | |
| शांतता क्षेत्र | 50 dB | 40 dB | | |

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० या कलम ३ (५) नुसार शहरात शांतता झोनप्रमाणे १) शैक्षणिक संस्थांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र २) सर्व न्यायालयाच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र व ३) रुग्णालयाच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्राच्या आत उक्त नमूद ध्वनी मर्यादेपेक्षा जास्त आवाजाचे साउंड, लाउडस्पीकर, डीजे, आदी वापरल्यास अथवा नियमांचे उल्लंघन केल्यास पर्यावरण (संरक्षण) कायदा–१९८६, ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम–२००० व तद्नंतरचे सुधारित नियमावलीनुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सण, समारंभ उत्सव व अन्य कारणासाठी वापरण्यात येणारे साउंड, लाउडस्पीकर, डीजे, लावण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणाची रीतसर परवानगी घेऊनच वाजवावेत/ लावावेत. नागरीकांनी नियमबाह्य साउंड, लाउडस्पीकर, डीजेचे आवाज निदर्शनास आल्यास तात्काळ वरील नमूद संपर्क क्रमांकावर अथवा SMS व WhatsApp क्रमांकावर अथवा ई–मेलद्वारे अथवा वेबसाईट अथवा प्रत्यक्ष, या कार्यालयास कळवावे व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यास प्रशासनास सहकार्य करावे.

**सही/–**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

# नवी मुंबईतील उद्योग व व्यवसायांना चालना

## बांधकाम व्यावसायिक, वास्तुविशारद, व्यापाऱ्यांशी सुसंवाद



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील उद्योग व व्यवसायास चालना देण्यासाठी उद्योजक व व्यावसायिक यांच्या अडचणी जाणून घेण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने महापालिका मुख्यालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये आयुक्तांनी उपस्थित उद्योजक व व्यावसायिक यांच्याशी संवाद साधत त्यांना प्रशासकीय पातळीवर जाणवणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या व त्यामधील तातडीने करावयाच्या बाबींवर पूर्तता करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. या वेळी महापालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण उपस्थित होते.

या बैठकीमध्ये एमआयडीसी, एपीएमसी मार्केट यांचे उच्च अधिकारी तसेच ठाणे बेलापूर इंडस्ट्रीज असो., स्मॉल स्केल इंड. असो., क्रेडाई एमसीएचआय नवी मुंबई बिल्डर्स असो., इंडियन इन्स्टिट्युट ऑफ आर्किटेक्ट असो., केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असो., होलसेलर्स असो., नवी मुंबई व्यापारी असो. यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी सर्व संस्था प्रतिनिधींनी मनोगतातून व्यक्त केलेल्या अडी-अडचणी, सूचना आयुक्तांनी जाणून घेतल्या व त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित महापालिका विभागांना दिले. महापालिका क्षेत्रात उद्योग, व्यवसाय करणाऱ्या घटकांमुळे शहराचे महत्व वाढते असे स्पष्ट करीत या घटकांशी नियमित संवाद रहावा यादृष्टीने अशा प्रकारच्या बैठका यापुढील काळात नियमित आयोजन करण्यात येतील, असे आयुक्तांनी सांगितले.

उद्योग, बांधकामे व व्यवसायासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या, प्रमाणपत्रे जलद व सहजपणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ऑनलाईन कार्यपद्धतीचा अंगिकार करून कार्यप्रणालीत सुधारणा व गतीमानता आणण्याच्या दृष्टीने एक खिडकी संकल्पनेनुसार कार्यवाही सुरू असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.

पुनर्विकासांतर्गत होणाऱ्या बांधकामांमुळे शहराची लोकसंख्येत आगामी काळात पडणारी लक्षणीय भर लक्षात घेता शहराला भविष्यात असलेली पाण्याची गरज लक्षात घेऊन बांधकामे करताना महापालिकेच्या अत्याधुनिक मलप्रक्रिया केंद्रांतील शुध्दीकरण केलेल्या पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा वापर बांधकामासाठी व पिण्याव्यतिरिक्त इतर बाबींसाठी करावा व पिण्याच्या पाण्याची बचत करावी असे आयुक्तांनी पुन्हा एकवार सर्वांना सांगितले. काही गोष्टी सामाजिक जबाबदारी म्हणून करणे गरजेचे असते याची आयुक्तांनी जाणीव करून दिली. मुख्यमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतील क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्यामधील सात कलमांमध्ये गुंतवणूकीस प्रोत्साहन हेदेखील एक महत्वाचे कलम असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करताना ही बैठक महत्त्वाची होती.

स्वच्छ सर्वेक्षणातील महत्त्वाचा भाग असलेल्या नागरिकांचा प्रतिसाद अर्थात सिटीझन फिडबॅक नोंदविण्यास स्वच्छ भारत मिशनमार्फत सुरूवात झाली असून https://sbmurban.org/feedback या लिंकवर क्लिक करून नागरिक शहर स्वच्छतेविषयीचा आपला अभिप्राय पवर नोंदवू शकतात. त्यानुसार प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपल्या मोबाईलवरून शहराच्या सर्वोत्तम मानांकनासाठी सर्वेक्षणात विचारल्या जाणाऱ्या १० प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे देऊन आपल्या नवी मुंबई शहराचे मानांकन उंचवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याविषयी बैठकीत माहिती देण्यात आली व अभिप्राय नोंदवून प्रात्यक्षिक करण्यात आले. अशाप्रकारे प्रत्येकाने आपले कुटुंबिय, मित्र-परिवार, कार्यालयीन सहकारी यांनाही अभिप्राय नोंदविण्यास प्रोत्साहीत करावे, असे या वेळी सूचित करण्यात आले.

अशाप्रकारे आयुक्तांनी विशेष बैठक आयोजित करून आमच्या समस्या जाणून घेतल्या व त्याच्या निराकरणासाठी ठोस पावले उचलण्याच्या दृष्टीने आश्वस्त केल्याबद्दल बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक यांनी आभार मानले.

# सानपाडा नोडमध्ये धुरीकरण सप्ताह राबविण्याची भाजपकडून मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा सिडको नोड, सानपाडा गाव, सानपाडा पामबीच परिसरात सार्वजनिक जागा, गृहनिर्माण सोसायटीच्या आवारात तसेच बाहेरील परिसरात धुरीकरण अभियान सप्ताह राबविण्याची लेखी मागणी भाजयुमोचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.



सानपाडा परिसरातील सिडको सोसायट्याचा सानपाडा नोड, सानपाडा गाव आणि सानपाडा पामबीच परिसरात डासांचा उद्रेक वाढीस लागला असून स्थानिक रहीवाशी त्रस्त झाले आहेत. स्थानिक रहिवाशांना सांयकाळी ६ नंतर सार्वजनिक उद्यानामध्ये बसणेही अवघड झाले आहे. इतकेच नाहीतर सोसायटीच्या आवारातही जेवण झाल्यानंतर शतपावलीही करता येत नाही. डासांमुळे सांयकाळनंतर दारे-खिडक्या बंद करून घरात बसावे लागते. डासांच्या त्रासामुळे मलेरियासारखे आजार पुन्हा वाढीस लागले आहेत.

सानपाडा नोड, सानपाडा गाव आणि सानपाडा पामबीच परिसरात डासांचा उद्रेक संपुष्टात आणण्यासाठी महापालिका प्रशासनाने संबंधितांना गटारांमध्ये अळीनाशके टाकण्याचे व धुरीकरण करण्याचे तसेच उद्यान, क्रिडांगणे तसेच गृहनिर्माण सोसायटीच्या आतील व बाहेरील भागात तातडीने धुरीकरण करण्याचे संबंधितांना निर्देश देवून स्थानिक रहीवाशांना दिलासा देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिकांसाठी मुदतवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका ३१ जानेवारी २०२५ रोजीपर्यंत मागविण्यात आल्या होत्या. या प्रवेशिका पाठविण्यास २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in व www.maharshtra.gov.in तसेच https://mahasamvad.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# वाशी येथे अभिनेते मकरंद अनासपुरेंचे बुधवारी मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नाम फाऊंडेशनचे संस्थापक तथा सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे हे अनुभवाचे बोल या विषयावर वाशी येथे महाशिवरात्रीच्या कार्यक्रमानिमित्त मार्गदर्शन करणार आहेत.

श्री सोमेश्वर शिवमंदीर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने वाशीतील एम.जी. कॉम्प्लेक्स येथे महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती माजी नगरसेवक प्रकाश (भाऊ) मोरे यांनी दिली.

या कार्यक्रमामध्ये शिवरुद्रयाग यज्ञ आणि महाप्रसादाचे (भंडारा), गायत्री पाठ, जनजागृती भारूड मंडळ, भारूडसम्राट गोविंद महाराज गायकवाड हे विनोदातून समाज प्रबोधन करणारे भारूड सादर करण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी हळदी समारंभ होणार आहे. २५ फेब्रवारी या दिवशी सायंकाळी ६ वाजता अभिनेते मकरंद अनासपुरे हे अनुभवाचे बोल या विषयावर व्याख्यान देणार आहे.

२६ फेब्रुवारी या दिवशी सकाळी ५ वाजता शिवलिंग महाभिषेक सोहळा, शिवरूद्रयाग यज्ञ आणि दर्शन सोहळा, सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर, सायंकाळी ६ वाजल्यापासून महाप्रसाद (भंडारा) होणार आहे. या कार्यक्रमाला वन मंत्री गणेश नाईक, माजी आमदार संदीप नाईक आदी उपस्थित रहाणार आहेत.

# संत गाडगेबाबांना अभिवादन




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ अशा शब्दात आचार्य अत्रे यांनी गौरव केलेले गाडगे महाराज थोर कर्मयोगी संत होते. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता दूर करण्यासाठी त्यांनी कीर्तनासारख्या लोकप्रिय माध्यमाचा प्रभावी वापर करुन लोकजागृती केली. अनाथ, रंजल्या गांजल्यांसाठी मोठया संख्येने धर्मशाळा, आश्रम, शाळा सुरू करून त्यांनी समाजाला शहाणे करण्यासोबतच हक्काचा आधार दिला.

कोणताही समाजोपयोगी संदेश स्वकृतीतून पटवून देणाऱ्या गाडगे महाराजांचे स्मरण करीत त्यांनी दिलेला स्वच्छतेचा मंत्र नवी मुंबई महापालिका मनापासून जपत असून त्यादृष्टीने स्वच्छता कार्याला लोकचळवळीचे स्वरुप दिले जात आहे.



**पनवेल : गेली अनेक वर्षे कीर्तनकारांना संवादिनी साथ करणारे आणि स्वत: उत्तम भजनीबुवा असणारे चंद्रकांत मने यांना नुकतेच पुणे येथील हरी किर्तनोत्तेजक संस्थेने 'स्वर सुधाकर' या पदवीने सन्मानित केले.**

# वाशी येथे भक्ती शक्ती रेल्वे प्रवासी भजन स्पर्धा उत्साहात

## मंत्री गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी येथे विठूमाऊलीच्या गजरात भक्ती शक्ती रेल्वे प्रवासी भजन स्पर्धा झाली. या सोहळ्यास वनमंत्री गणेश नाईक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली होते.

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष व माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवराय भजन मंडळ, वाशी, श्री संत तुकाराम महाराज रेल्वे प्रवासी भजन मंडळ, वाशी व संलग्न नवविधा भक्ती सेवा समिती हार्बर लाईन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत २२ भजनी मंडळे सहभागी झाली होती.

भजनी परंपरेतून सामाजिक दायित्व जपणारी रेल्वे प्रवासी भजन मंडळे या स्पर्धेत सहभागी होऊन नामस्मरण आणि संतवाणीच्या माध्यमातून वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

या वेळी ना. गणेश नाईक यांच्याकडे प्रवासी भजनी मंडळानी निवेदनाद्वारे समस्या मांडलेल्या त्यावर सकारात्मकता तोडगा काढण्याचे आश्वासन नाईक यांनी दिले.

सकाळी ७ वाजता वाशी रेल्वे स्टेशन येथे सीएसटीकडे जाणाऱ्या रेल्वेचे पूजन आणि मोटरमन यांचा सन्मान करून, वाशी रेल्वे स्टेशन ते सिडको ऑडिटोरियम दरम्यान दिंडी काढण्यात आली होती. या दिंडीत भाविक मोठया संख्येने सहभागी झाले होते.

या स्पर्धेला परीक्षक म्हणून नवी मुंबईकर असलेल्या संगीत विशारद व गायनचार्या ह.भ.प पूर्वाताई पाटील आणि संगीत विशारद ह.भ.प किरण महाराज पाटील यांनी सेवा दिली.

या वेळी दशरथ भगत म्हणाले की, भजनातून प्रवाशांचा प्रवास सुखद व्हावा हीच भावना या रेल्वे प्रवासी भजनी मंडळांची असते. भजनातून मागील ५० वर्षाहून अधिक काळ २६१ भजन मंडळांकडून प्रार्थना केली जात आहे. ही भजन मंडळे अध्यात्मातून सकारात्मक आचार-विचार, नशामुक्ती आणि रेल्वे स्वच्छता अशा परिवर्तनरुपी समर्पित समाजसेवेद्वारे संपूर्ण रेल्वे यंत्रणेला संरक्षण कवच निर्माण करीत आहेत.

या वेळी व्यासपीठावर स्पर्धेचे संयोजक निशांत भगत, संदिप भगत, ज्ञानेश्वर माऊली भजनी सामाजिक संस्था या तीनही रेल्वे लाईन्स वरील भजनी मंडळाच्या शिखरस संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प हनुमंत महाराज तावरे, अनिल महाराज मोरे, ह.भ.प राम महाराज रांजणे हे उपस्थित होते.



**पनवेल : जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या कुर्ला येथील हायस्कूलच्या अकरावीच्या १९६७-१९६८च्या बॅचमधील विद्यार्थ्यांचा तब्बल ५७ वर्षांनी स्नेहमेळावा पनवेलमध्ये उत्साहात झाला. या वेळी प्रत्येकाने गमती जमती उत्साहाने सांगितल्या. गाणी, कविता सादर केल्या. या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर उपस्थित होते.**













**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी अनेकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते सुधीर ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अविनाश कुलकर्णी, नायर मॅडम आदी उपस्थित होते.**

## निवडक

### खंडाळा घाटात दर रविवारी सफाई

**खोपोली :** ऐतिहासिक वारसा सांगत असलेल्या खंडाळा घाटाचे पाच किमी अंतर व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता व्हावी. तसेच येथील ऐतिहासिक खाणाखुणांना नव्याने जागृती मिळावी यासाठी खोपोली यशवंती हायकर्स व शिवप्रेमी यांच्या माध्यमातून दर रविवारी खंडाळा घाट स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात येणार आहे. या महिमेत खोपोली नगरपालिका ही सहभागी होणार असून, नगरपालिका प्रशासन, यशवंती हायकर्स आणि लोक सहभागाच्या माध्यमातून ऐतिहासिक खंडाळा घाट व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता केली जाणार आहे. या मोहिमेत जास्तीतजास्त नागरिकांनी व सामाजिक संस्था तसेच कार्यकर्त्यांनी ही सहभागी होण्याचे आवाहन नगरपालिका मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील व यशवंती हायकर्सचे अध्यक्ष मच्छिंद्र यादव यांनी केले आहे.

### मुरुडमध्ये मार्गदर्शन शिबिर

**मुरुड :** येथील सार्वजनिक वाचनालयात मंगळवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता कौशल्य विकास व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.` तरुणांकरीता व महिला बचत गटांकरीता सुवर्णसंधी असणार आहे. तसेच शासकिय कर्ज मिळणेबाबत मार्गदर्शन असणार आहे तरी जास्तीत जास्त तरुणांनी व महिलांनी सहभाग नोंदुन लाभ घ्यावा, असे आवाहन मुरुड सार्वजनिक वाचनालया कडुन करण्यात आले आहे.शिबिराचे मार्गदर्शक औद्योगिक परिवेक्षक खादी ग्रामोद्योग रायगड लतिका रमेश कवडे, कौशल्य विकास विभाग अधिक्षक अमिता एम. पवार, जिल्हा उद्योग केंद्र मॅनेजर हरलिया सरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# रायगड जिल्ह्यात १ मार्चपासून जेई लसीकरण

## जपानी एन्सेफलाइटिस अभियानांतर्गत मोहीम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात एक ते पंधरा वर्षे वयोगटातील एकूण ६,२१,६९८ मुला–मुलींना शनिवार १ मार्च २०२५ पासून पुढे सोळा दिवस लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.

जे.ई हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. तो मेंदूवर परिणाम करतो हा आजार संक्रमित डासाच्या विशेषत: प्रजातीच्या डासाच्या चावण्याद्वारे पसरतो. हा अतिशय प्राणघातक आहे. प्रामुख्याने पंधरा वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना प्रभावित करतो. या आजाराची लागण झालेल्यांपैकी ७० टक्के लोकांच्या जीवितास हानी होते किंवा कायमचे अपंगत्व येते. जे.ई व्हायरस हा एलोफेअर व्हायरस आणि डेंगू वायरस (FLAVIVRIDAE) जातीचा आहे. जे.ई विषाणू विशेषत: क्युलेक्स विषाणू गटातील (उद.TRIT-ENEORTHYNCHUS) क्युलेक्स डासाच्या चावण्याद्वारे प्रसारित होतो. जलपक्षी व डुक्कर या जंतूंची वाढ करतात. तथापि मानवाकडून मानवाला प्रसार होत नाही. भारतात याचा प्रसार मुख्यतः पावसाळ्यात आणि पावसाळ्यानंतरच्या




हंगामात होतो.

आजाराची लक्षणे–१) ताप २) डोकेदुखी ३) उलट्या ४) फिट येणे आणि ५) कोमा हे आहे.

जे.ई प्रतिबंध आणि नियंत्रण नियंत्रण उपाय–१) वयक्तीक संरक्षण, अळी नियंत्रण.,२) डुक्कर नियंत्रण.,

३) या आजारावर प्रतिबंधकउपचार म्हणून लसीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

ही लसीकरण मोहीम आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व एकात्मिक बालविकास विभाग यांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी ग्रामीण भागातील व शहरी भागातील प्राथमिक आरोग्यकेंद्रे, उपकेंद्रे, प्राथमिक व माध्यमिक शाळा, अंगणवाडी, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय या सर्व ठिकाणी लस मोफत दिली जाणार आहे. या ठिकाणी कार्यरत असणारे सर्व अधिकारी, कर्मचारी, अशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांचा सहभाग नोंदविला जाणार आहे.

या लसीकरण मोहिमेसाठी १५ तालुक्यांमध्ये २८८ उपकेंद्रे, १९६४ गावे, १७८८ आशा स्वयंसेविका, २९१० अंगणवाडी कार्यकर्ते, आणि शाळेमधील ३७७१ शिक्षक, तसेच ३११लस टोचक आणि १५५ टीम तयार करण्यात आली आहे. अशा पद्धतीने नियोजन करण्यात आलेले आहे.

या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बाष्टेवाड यांनी केले आहे.

# विहुले दुसऱ्यांदा 'स्वप्नातील गाव' घोषित

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वप्नातील गावचा सोहळा मोठ्या उत्साहात ग्रामस्थ, महिला, तरुण वर्ग व गाव विकास समिती विहुले तसेच स्वदेस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या जल्लोषात अतिशय उत्साहामध्ये झाला.

या वेळी प्रमुख पाहुणे माणगांव तालुक्याचे माजी सभापती संगीता बक्कम माजी उपसभापती गजानन अधिकारी, स्वदेस फॉउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, माणगांव चे व्यवस्थापक शीतल सूर्यवंशी, सुबोध काणेकर, सिद्धेश शिर्के, डॉ. केतन चव्हाण, प्राप्ती मोरे, ग्रामपंचायत सरपंच अस्मिता केबळे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, विभागीय समिती अध्यक्ष व विभातील मान्यवर गाव विकास समितीतील सदस्य, ग्रामस्थ कमिटी हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

स्वप्नातील गाव घोषित करताना गाव समितीचे सदस्य व ग्रा.प. सदस्य समीर महाडिक यांनी प्रास्ताविक केले. गाव विकास समिती अध्यक्ष स्टार स्वदेस मित्र उषा दळवी व भारत महाडिक यांनी स्वप्नातील गाव होण्यासाठी येणारे अडथळे व त्यावर केलेली मात याविषयी सर्वांना माहिती दिली. कशाप्रकारे गावामध्ये स्वच्छ, सुंदर, स्वास्थ, सक्षम, साक्षर या पाच सूत्रांवर काम सुरु केले



तसेच गावात मागील तीन वर्षापासून शासन, स्वदेस, समुदाय, संदर्भात गावाच्या प्रगतीची माहिती दिली. गाव विकास समितीने शासकीय योजनेतून बऱ्याच योजना गाव विकास समिती मार्फत पाठपुरवठा घेऊन करण्यात आल्या. त्यासोबतच गाव विकास समितीने क्राउड फंडिंग च्या माध्यमातून निधी उभारला. या निधीच्या माध्यमातून गावच्या विकासासाठी बरीच कामे झाली आहेत

१०० टक्के स्वप्नातील गाव म्हणून घोषित होईल तसेच गावातील लोकांचे उत्पन्न कशा प्रकारे वाढवता येईल आणखी गावांसाठी काय केले जाऊ शकते या सारख्या बऱ्याच विषयावर तुषार इनामदार यांनी मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. विहुले गावामध्ये राहिलेली कामे लवकरच पूर्ण करून घेऊ असे ग्रामस्थ अध्यक्ष विजय महाडिक व गाव विकास समिती सचिव नरेश अंधेरे यांनी सांगितले. गाव विकास समितीच्या सर्व सदस्यांनी सांगितले की, यापुढे देखील गावाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्यासाठी आम्ही गाव विकास समिती व ग्रामस्थ, महिला, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही यांनी दिली.

गावाला योग्य दिशा दाखवुन गावचा विकास करण्यासाठी नेहमी स्वदेस फाउंडेशन चे सहकार्य लाभले तसेच स्वप्नातील गाव जाहीर झाल्या बद्धल माजी सरपंच साई हुसेन रहाटविलकर यांनी शुभेच्छा दिल्या. गाव विकास समितीच्या वतीने सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक योगेश गुगले यांनी केले स्वदेस फाऊंडेशन व शासन यांचे आभार भारत महाडिक यांनी मानले. हा कार्यक्रम अधिक चांगला करण्यासाठी गावातील जेष्ठ मंडळी महिला बचत गट युवक मंडळ, युवती यांनी मेहनत घेतली.

# नडोदे गावातील सण होणार फटाकेमुक्त!

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत नडोदे यांच्या वतीने माझी वसुंधरा कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामपंचायत हद्दीत सगळे सण व लग्न समारंभ हे फटाके मुक्त करणार असल्याचे ग्रामपंचायतीने ठराव घेऊन अंमलबजावणी करणार असल्याचे सांगण्यात आले.

शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या माझी वसुंधरा या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध प्रकारच्या योजना वतीने राबविण्यात येणार आहेत. नडोदे ग्रुप ग्रामपंचायत यांच्यावतीने पंचायत हद्दीत जेवढी गावे वाड्या वस्त्या आहेत. तिथे सगळेच धार्मिक सण असो किंवा लग्न समारंभ असतील, ते फटाके मुक्त करण्याचा निर्धार ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामसभेत करण्यात आला आहे.या ठरावाला ग्रामस्थांनीदेखील चांगला प्रतिसाद दिला असून अंमलबजावणी करण्याचे ठरले आहे.

याचे कारण असे की फटाक्यांच्या धुराने वायू प्रदूषण होत असल्याने मानवी जीवनाला व पर्यावरणाला हानिकारक असलेल्या गोष्टी ज्याच्यापासून पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये व पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी फटाके मुक्त ग्रामपंचायत हा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाच्या वतीने अनेक योजना माझी वसुंधरा या अभियानाच्या वतीने सुरू करण्यात आल्या आहेत. त्यातच अनेक योजना मार्गस्थ लागत आहेत अशातच नवीन निर्णयाचे स्वागतच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, असे आवाहन ग्रामविकास अधिकारी ईश्वर पवार यांनी केले आहे.

# मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची क्षेत्रभेट

**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी मोरे फाउंडेशन संचलित कला वाणिज्य विज्ञान महिला महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थिनींची क्षेत्रभेट २२ फेब्रुवारी रोजी कुंडलिका नागरी सहकारी पतसंस्था, कोलाड– रोहा येथे आयोजित करण्यात आली.

महिला महाविद्यालयातील शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत क्षेत्रभेटीमध्ये बँकिंग क्षेत्रातील सहकारी पतसंस्थेच्या कामकाजाची माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. पतसंस्थेचे अध्यक्ष विवेक वत्सराज, उपाध्यक्ष अविनाश दाते, माजी अध्यक्ष चंद्रशेखर जोशी, व्यवस्थापक प्रमोद फुलारे, संचालक यज्ञेश भांड या सर्वांनी बँकिंग क्षेत्रातील करिअर आणि स्पर्धा परीक्षा संदर्भात मार्गदर्शन केले.

या क्षेत्रभेटीत महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे प्रा. नरेश घाग, प्रा. मयुर पाखर तसेच प्रा. रमा देशमुख यांच्यासह ३२ विद्यार्थिनीनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या सर्टिफिकेट कोर्स समितीच्या प्रमुख प्रा. शिल्पा खाडे यांनी या क्षेत्रभेटीचे आयोजन केले.

# रोह्यात विद्यार्थ्यांना शिवरायांच्या जीवनावर लिखित पुस्तकांची भेट




**रोहे : प्रतिनिधी**

रोहा राष्ट्रवादीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील विविध पुस्तकांचे संच रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील शाळेंना देण्यात आले.

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वराज्य सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या विविध शाळेतील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकथा, त्यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू लहान मुलांच्या भाषेत सांगणाऱ्या पुस्तकांचे संच भेट देण्यात आले.

या अभिनव उपक्रमाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कथा सांगून, वाचून बालकांच्या मनात स्वराज्य संस्काराचे बीज पेरण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मानस आहे. या कार्यक्रमासाठी महेंद्र गुजर, महेश कोल्हटकर, जितेंद्र पडवळ, शहराध्यक्ष अमित उकडे, उपाध्यक्ष चंद्रकांत पार्टे, विनीत वाकडे, स्वप्नील धनावडे, राष्ट्रवादी विद्यार्थी सेल अध्यक्ष माझ सवाल, मिहिर शृंगारपुरे उपस्थित होते.

# खालापुरात द ग्रीन स्कूल उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

टाटा स्टील फाऊंडेशन आणि द एनर्जी अ‍ॅण्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (TERI) यांचा सहकार्याने द ग्रीन स्कूल या उपक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद विद्यामंदिर खालापूर येथे करण्यात करण्यात आली.

खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रोशना मोडवे, टाटा स्टील फाऊंडेशन खोपोलीचे युनिट लीड भावेश रावल, दिपीका सिंग, मुख्याध्यापक पाटील, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कचरा व्यवस्थापन, ऊर्जा, पाणी आणि जैवविविधतेशी संबंधित मुद्द्यांवर क्षमता वाढवणे आणि वर्तणुकीतील बदलांना प्रोत्साहन देण्यावर या उपक्रमाचा भर आहे.

स्वामी विवेकानंद विद्यामंदिर खालापूर येथे शुभम राय, राकेश तिवारी आणि कामिनी सिलोरा यांचा समावेश असलेल्या ग्रीन स्कूल संघाने शाळेतील शिक्षकांचे मूल्यांकन करण्यासाठी ज्ञान, वृत्ती आणि सराव अभ्यासासह अनेक क्रियाकलाप आयोजित केले.

पर्यावरणीय समस्या आणि शिकवण्याच्या पद्धतींबद्दल त्यांची समज याव्यतिरिक्त, इयत्ता सहावी ते आठवीमधील पन्नास विद्यार्थ्यांनी कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधतेवर कार्यशाळेचा प्रभाव मोजण्यासाठी आधारभूत मूल्यांकनामध्ये भाग घेतला. मूल्यांकनानंतर, फ्लिपचार्ट वापरून परस्परसंवादी सादरीकरणाद्वारे मूलभूत संकल्पना मांडण्यासाठी कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता या विषयावर शैक्षणिक सत्रांचे आयोजन करण्यात आले.

सूत्रसंचालन स्वामी विवेकानंद विद्यामंदिर खालापूरचे सागर माळी यांनी केले तर प्रस्तावना टाटा स्टील फाऊंडेशन खोपोलीच्या तेजल पाटील यांनी मांडली.



# नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयात शनिवारी (दि.२२) तृतीय वर्ष विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन द.ग तटकरे मधील प्राचार्य डॉ. बबन खामकर, नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र राठोड उपस्थित होते.

आपण सर्वांनी स्वावलंबी राहीले पाहिजे, आपली जबाबदारी आपल्याला कळावी त्याचंबरोबर नीटनिटकेपणा आपल्या अंगी असावे आणि वकीली क्षेत्रात आपण कायम योग्य पद्धतीनी पीडितांना न्याय मिळवून देता आला पाहिजे असे मार्गदर्शन द ग तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बबन खामकर यांनी केले. नामदेव सुर्वे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र राठोड यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना विद्यार्थी कक्षेत असताना ज्या ज्या चुका झाल्या आहेत. त्या आता तुम्हाला पुढे भविष्यात करता येणार नाहीत.

वकिली क्षेत्रात चुकीला माफी नाही. तुम्ही एखाद्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उभे आहात आणि पूर्ण पणे जबाबदारी तुमची असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमास प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गातील विधी शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचा कलागुणांना वाव -अजित कासार

## मजगाव शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव खऱ्या अर्थाने शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून मिळत असतो. यासाठी रायगड जिल्हा परिषदेतील शिक्षक वृंद सुद्धा खूप मोठी मेहनत घेत असतो. विविध नाटिका व नृत्य केल्याने शालेय विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. यामधूनच नवीन कलाकार निर्माण होत असतात. यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम होणे खूप गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व माजी सरपंच अजित बाळकृष्ण कासार यांनी केले.

रायगड जिल्हा परिषद मजगांव मराठी शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध



उपक्रम आयोजित केले होते. या उपक्रमांतर्गत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाची सांगता विविध गुणदर्शन कार्यक्रमाने करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित कासार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व फीत कापून करण्यात आले.

या वेळी त्यांच्या समवेत सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, आगरदांडा सरपंच आशिष हेदूलकर, सामाजिक कार्यकर्ते नितेश पाटील, प्रशांत मिठाग्री, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी, उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी, दिक्षा भोईर, सरिता धसाडे, पुजा भोईर, करूणा पाटील, प्रणिता पाटील, रूपेश पाके, रूपेश अंबाजी तसेच शिक्षक नेते देवानंद गोगर, राजेंद्र नाईक, जगदीश चवरकर, भास्कर साळावकर, हेमंत गुंड हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक हेमकांत गोयजी तर सूत्रसंचालन चेतन चव्हाण यांनी केले तसेच मनिषा वाघरे, हर्षा नांदगांवकर, प्रमिला फुंदे, संतोष दहातोंडे या शिक्षकवृंदानी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# नांदगाव येथील श्री गुरूमाता सेवाश्रमात महाशिवरात्र महोत्सव

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री गुरु सावर्डेकर महाराज संस्थापित रुद्ररेवा सेवा प्रतिष्ठान, आळंदी देवाची अंतर्गत श्रीगुरुमाता सेवाश्रम विनामूल्य वृद्धाश्रम, अनाथाश्रम नांदगाव येथे २५ ते २८ फेबुवारी २०२५ या कालावधीत भव्य महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीगुरु सावर्डेकर महाराजांच्या मार्गदशनाने खासदार सुनिल तटकरे आमदार महेंद दळवी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील साधू, संत, सज्जन, मुरुड तालुका वाराकरी सांप्रदाय, तालुक्यातील मान्यवर नांदगाव मजगाव पंचक्रोशी ग्रामस्थ यांच्या सहकार्याने श्री गुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे हा महोत्सव होणार आहे. श्री सिध्दीविनायक मंदिर येथे सेवाश्रम परिवारातील मान्यवरांच्या हस्ते पत्रिका पूजन कार्यक्रमाने महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला.

महाशिवरात्र महोत्सवात आगमोक्त यज्ञ, शिवपूजन, भजन, प्रवचन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतील. महाशिवरात्रच्या दिवशी सकाळी १० वाजता श्री गुरुमाता सेवाश्रम येथून भव्य दिव्य पालखी सोहळा श्री



अमृतेश्वर मंदिर येथे जाईल. रात्री ११–३० वाजता सेवाश्रमात कीर्तनानंतर निशिथकालीन आगमोक्त शिवपूजन कार्यक्रमानंतर उपस्थितांना मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग येथे सिद्ध केलेले प्रसाद भेट देण्यात येतील.

या महोत्सवात गणेश महाराज कुडगावकर, पांडुरंग महाराज अदावडे, दिलीप महाराज ठाकूर, अनंता पाटील , संजय ठाकूर, आशिष बुल्लू या मान्यवरांची प्रवचने व्याख्याने व महादेव महाराज कावळे दिघी, मारुती महाराज शेजाळ चिखली, दैवत महाराज पाटील जीवना व श्रीगुरु सावर्डेकर महाराज आळंदी देवाची यांचे गोपाळ काल्याचे किर्तना नंतर महाप्रसाद होईल. या महोत्सवात सर्व शिवभक्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री गुरुमाता सेवाश्रम परिवार नांदगाव व श्री गुरु सावर्डेकर महाराज शिष्य परिवार यांनीकेलेले आहे.

या कार्यक्रमाचे व श्री गुरुमाता सेवाश्रमाचे (विनामूल्य वृद्धाश्रम व अनाथाश्रम), विनामूल्य संस्कार शिबिर, विनामूल्य वारकरी शिक्षण संस्था, व्यसनमुक्ती समुपदेशन, आगमोक्त धर्मकार्य विधी, इत्यादी सेवा प्रकल्पांच्या माहितीसाठी सावर्डेकर महाराज ९०११२३९६३२, दिपेश पेरवे खारांबोळी ७९७२४४९३९, रश्मी राम पाटील, मजगाव, ९२०९८४३१९१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री गुरुमाता सेवाश्रम परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# विराटच्या शतकाचा पाकिस्तानमध्येही जल्लोष

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताने आघाडीचा फलंदाज विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर पाकिस्तानविरूद्ध सहा गडी राखून मोठा विजय मिळवला आहे. यानंतर पाकिस्तानमधील चाहत्यांनीदेखील एकच जल्लोष केला.

विराट कोहलीने जबरदस्त पुनरागमन करत पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले आणि भारताचा विजय निश्चित केला. विराटने विजयी चौकार लगावला आणि भारताला विजय मिळवून दिला. यासह त्याने स्वतःचे शतकही पूर्ण केले.

विराटच्या विजयी व शतकी चौकारानंतर जगभरातील भारतीय क्रिकेट संघाच्या चाहत्यांनी एकच जल्लोष केला. भारतात अनेक ठिकाणी चाहत्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत आपला विजय साजरा केला. विराटचे जगभर चाहते आहेत. भारताचा पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानातही त्याचे चाहते असून विराटने शतक पूर्ण केल्यानंतर या पाकिस्तानमधील चाहत्यांनीही एकच जल्लोष केला.



पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये काही सार्वजनिक ठिकाणी मोठ्या स्क्रीन लावून भारत-पाकिस्तान सामना दाखवला जात होता. त्यापैकी एका ठिकाणी सामना पाहण्यासाठी जमलेल्या शेकडो लोकांपैकी काहींनी विराटच्या शतकानंतर जल्लोष केला. 'कोहली कोहली' अशा घोषणा दिल्या. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.

पाकिस्तानमधील पत्रकार मुहम्मद फैजान अस्लम खान यांनी हा व्हिडीओ एक्सवर शेअर केला आहे. अर्सियन नसीर यांनी एक्सवर एक पोस्ट केली होती. ज्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, आमच्या लोकांची मानसिक स्थिती विचित्र आहे. इथे काही लोक विराट कोहलीचे शतक व्हावे म्हणून त्याला चिअर करत होते. या पोस्टवर कमेंट करत मुहम्मद फैजान यांनी हा व्हिडीओ शेअर केला आहे.

## आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळाई क्रिकेट क्लब चिपळे आणि ग्रामस्थ मंडळ चिपळे यांच्यातर्फे आमदार चषक २०२५ या मर्यादित षटकांच्या डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन २६ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत चिपळे डॅमसमोरील आझाद मैदानात करण्यात आले आहे.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक एक लाख रुपये, द्वितीय ५० हजार रुपये, तृतीय, चतुर्थ, पाचवे, सहावे पारितोषिक २५ हजार रुपये आणि सर्व विजेत्या संघांना चषक देण्यात येणार आहे. प्रत्येक सामन्यासाठी सामन्यासाठी सामनावीर किताब दिला जाईल तसेच स्पर्धेतील मालिकावीराला मोटरसायकल आणि फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक यांना सायकल बक्षीस दिली जाणार आहे. या सामन्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# उदय देवरे 'खासदार श्री'चा मानकरी



**चौक : प्रतिनिधी**

युवा उद्योजक उमेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून खालापूर तालुक्यातील कुंभिवली येथे खासदार श्री शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये उदय देवरे याने बाजी मारत किताब पटकावला.

खालापूर तालुक्यातील जीत फिटनेस व एजे फिटनेस यांच्या सहकार्याने कुंभिवली येथे ५५, ६०, ६५, ७० व ७५ किलो वजनी गटातील शरीरसौष्ठव स्पर्धेबरोबरच महिलांची खुली शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. १५४ महिला व पुरुष यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता.

खासदार श्री किताबाचा मानकरी उदय देवरे, तर उपविजेता उद्देश ठाकूर ठरला. मोस्ट इम्प्रुव्हमेंट म्हणून हनुमान भगत, बेस्ट पोझर गणेश पाटील, मेन फिझिकल किताब बॉबी पाटील यांनी पटकावला, तर वूमन फिझिकल किताब राधा शिंदे हिने प्राप्त केला. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देण्यात आली. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनादेखील सन्मानित करण्यात आले.

या खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, पिंपरी चिंचवडचे नगरसेवक निलेश बारणे, निलेश पिंगळे, मारुती आडकर, खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, उमेश गायकवाड, रमेश खरे, राजेंद्र पालांडे, जगदीश आगीवले, चंदन भारती, जितेंद्र देशमुख, युवा वकील संघटना उपाध्यक्ष ॲड. सोमनाथ दळवी, कैलास विचारे, रमेश कातवारे, प्रमोद ननावरे, शरद शिर्के यांच्यासह शरीरसौष्ठव प्रेमी, व्यायाम पटू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धावण्याच्या शर्यतीत आरोही नलावडेला रौप्यपदक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय ज्युनिअर मैदानी स्पर्धा पंढरपूर येथे नुकतीच झाली. यातील धावण्याच्या स्पर्धेत आरोही नलावडे हिने रौप्यपदक पटकाविले.

महाराष्ट्र राज्य ॲथलेटीक्स असोसिएशन, सोलापूर जिल्हा ॲथलेटीक्स असोसिएशन आणि अजिंक्य स्पोर्ट्स ॲकडमी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा ही घेण्यात आली. यामध्ये यश मिळवणाऱ्या आरोहीचे अभिनंदन होत आहे. तिचे आई-वडील दोघेही पोलीस सेवेत कार्यरत आहेत.

## जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत रायवाडी संघ विजेता

**पाली : प्रतिनिधी**

रासळ येथे बंड्या मारुती क्रीडा मंडळ यांच्या वतीने आणि सुधागड तालुका व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत पांडबादेवी रायवाडी संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. सामने पाहण्यासाठी क्रीडारसिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. अंतिम लढत पांडबादेवी रायवाडी विरुद्ध चौंडेश्वरी कडसुरे या संघात झाली. यात रायवाडी संघाने बाजी मारली. या संघास रोख रक्कम २१ हजार रुपये व आकर्षक चषक, उपविजेत्या कडसुरे संघास १५ हजार रु. चषक देण्यात आला. तृतीय क्रमांक मिळविणारा



धावीर स्पोर्ट्स रोहा आणि चतुर्थ क्रमांक प्राप्त शिवशंभो पाटणेश्वर या दोन्ही संघांना प्रत्येकी सात हजार रु. व चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू प्रशांत जाधव, उत्कृष्ट चढाईपटू निखिल शिर्के, उत्कृष्ट पकड करणारा राकेश पाटील आणि पब्लिक हिरो यश पाटील या सर्व खेळाडूंना मंडळाच्या वतीने आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## हार्दिक पांड्याने गाठला दोनशे विकेट्सचा टप्पा

**मुंबई : प्रतिनिधी**

हार्दिक पांड्या याने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात उत्कृष्ट गोलंदाजी करत भारताला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला. पाकिस्तानी संघाचा माजी कर्णधार बाबर आझमला स्वस्तात बाद करून त्याने टीम इंडिया आणि चाहत्यांमध्ये आनंदाची लहर उमटवली. यानंतरही तो थांबला नाही, तर त्याने आणखी एक विकेट मिळवली. यासह पांड्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक नवा टप्पा गाठला आहे.

हार्दिक पांड्याने दोन विकेट्स घेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०० विकेट्स पूर्ण केल्या. पांड्याने भारतासाठी ११ कसोटी सामने खेळले असून १७ विकेट्स घेतल्या



आहेत. आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये त्याने ११४ सामने खेळून ९४ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने ९० सामने खेळून ८९ विकेट्स घेतल्या आहेत. अशा प्रकारे त्याने तिन्ही फॉरमॅटमध्ये एकत्र २०० विकेट्स घेतल्या आहेत. हार्दिकने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४१४९ धावा आणि २०० विकेट्स अशी कामगिरी केली आहे.

# रोहित शर्माने मोडला सचिनचा विक्रम; वनडेमध्ये कमी डावांत नऊ हजार धावा



**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा सलामीवीर आणि कर्णधार रोहित शर्माने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात एक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावे केला आहे. रोहितने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात फलंदाजीला उतरत खाते उघडताच मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

रोहितने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात खाते उघडताच एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून नऊ हजार धावा पूर्ण केल्या. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये केवळ १८१ डावात नऊ हजार धावांचा टप्पा ओलांडला. रोहितने सर्वात कमी डावांमध्ये नऊ हजार धावांचा आकडा गाठला आहे, जो एक नवा विश्वविक्रम आहे.

याआधी हा विक्रम भारतीय क्रिकेटचा देव म्हटल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या नावावर होता, ज्याने नऊ हजार धावांचा टप्पा १९७ डावांमध्ये गाठला होता. आता रोहित शर्माने हा विक्रम मोडून आपल्या नावावर केला आहे.

सचिनशिवाय रोहितने सौरव गांगुली, ख्रिस गेल, ॲडम गिलख्रिस्ट आणि सनथ जयसूर्यासारख्या दिग्गज सलामीवीरांनाही मागे टाकले आहे. गांगुलीने २३१ डाव, गेलने २४६ डाव, गिलख्रिस्टने २५३ डाव आणि जयसूर्याने २६८ डावांमध्ये वनडे क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून नऊ हजार धावा पूर्ण केल्या आहेत.

रोहित शर्माने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात वादळी सुरुवात केली, पण त्याला मोठी खेळी करता आली नाही. त्याने १५ चेंडूंत एक षटकार आणि तीन चौकारांसह २० धावा केल्या. तो लवकरच बाद झाला, पण त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

## सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धा

**उरण : बातमीदार**

न्हावाशेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी ही स्पर्धा २ मार्च रोजी उरण तालुक्यातील पिरकोन येथील धोंडूकाका मैदानावर होणार आहे.


ट्रान्सपोर्ट क्षेत्रात सर्वेचे काम करणाऱ्या तसेच ट्रक, कंटेनर, मालवाहतूक टेम्पो आदी अवजड वाहनांची कागदपत्रे तपासून योग्य जागी माल उतरविण्यासाठी मदत करणाऱ्या बांधवांना सीएचए (कस्टम हाऊस एजेंट) असे म्हणतात. उरण तालुक्यात स्थानिक भूमिपुत्र असलेली मराठी मंडळी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आहेत. या कामगारांना सतत फिरत काम करावे लागत असल्याने त्यांना अपघाताचा धोका जास्त असतो. अनेक सीएचए बांधवांचे अपघातदेखील झाले आहेत. अपघातग्रस्त सीएचए बंधू व समाजातील इतर अपघातग्रस्तांना निधी उपलब्ध व्हावा या दृष्टिकोनातून सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धा यंदाही आयोजित करण्यात आली आहे.

# पाकिस्तानच्या सलग दुसऱ्या पराभवानंतर शोएब अख्तर संघ व्यवस्थापनावर संतापला

**कराची : वृत्तसंस्था**

विराट कोहलीच्या शानदार शतकाच्या जोरावर भारताने चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात सहा गडी व ४५ चेंडू राखून मोठा विजय मिळवला आहे. यानंतर माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब अख्तरने पराभवाचे खापर संघ व्यवस्थापनावर फोडले आहे.

शोएब अख्तर म्हणाला, भारत पाकिस्तान सामन्याचा जो काही निकाल लागला आहे तो पाहून मी निराश झालेलो नाही, कारण मला अशा निकालाची कल्पना होतीच. पाकिस्तानी संघ व्यवस्थापनाला पाच गोलंदाजदेखील निवडता आले नाहीत. जगभरातील अनेक संघ सहा गोलंदाजांना घेऊन मैदानात उतरत आहे आणि पाकिस्तानचा संगम मात्र दोन अष्टपैलू खेळाडूंसह मैदानात उतरला होता. संघ व्यवस्थापनाच्या बिनडोक व मूर्खपणामुळे आपल्याला हा पराभव पहावा लागला आहे. त्यामुळे त्या बिचाऱ्या मुलांना



(पाकिस्तानी संघातील खेळाडू) आपण काय बोलणार? संघ व्यवस्थापन जसे आहे त्याचप्रमाणे आपली मुले क्रिकेट खेळत आहेत. त्यामुळे मी हा निकाल पाहून बिलकुल निराश झालो नाही.

माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू पुढे म्हणाला, संघ व्यवस्थापनाच्या चुकांमुळे संघातील खेळाडूंना नेमके करायचे काय आहे तेच माहिती नव्हते. त्यांच्याकडे तो आक्रमकपणा नव्हता. आपल्या खेळाडूंमध्ये चांगले कौशल्य दिसले नाही. रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल ज्याप्रमाणे खेळत होते तसे पाकिस्तानच्या फलंदाजांना खेळता आले नाही. आपल्या फलंदाजांनी नको त्या वेळी हवेत फटके मारले. भारतीय फलंदाजांनी ती चूक केली नाही.

### वासिम अक्रमची खोचक टिप्पणी

पाकिस्तानच्या कामगिरीचे विश्लेषम करताना माजी जलदगती गोलंदाज वासिम अक्रमने खोचक टिप्पणी केली आहे. एक व्यक्ती ज्योतिषाकडे जाऊन विचारतो की माझे भविष्य काय आहे? ज्योतिष सांगतो तू गरीब होशील. मग आणखी गरीब होशील. मग खूप गरीब होशील. त्यानंतर ही व्यक्ती विचारते, मग काय होईल? तेव्हा ज्योतिष त्याला सांगतो तुला गरिबीची सवय होईल. तीच अवस्था आमची झाली आहे. आम्हाला पराभवाची सवय झाली आहे, अशी टिप्पणी अक्रमने एका टीव्ही शोदरम्यान केली. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

## 'आयआयटी बाबा' नेटकऱ्यांच्या रडारवर!



**मुंबई : प्रतिनिधी**

विराट कोहलीने कितीही जोर लावला तरीही टीम इंडिया जिंकणार नाही, टीम इंडियाचा पराभव होणारच अशी भविष्यवाणी कुंभमेळ्यामुळे चर्चेत आलेल्या आयआयटी बाबाने वर्तवली होती, मात्र या भविष्याचा बार पार फुसका ठरवत टीम इंडियाने पाकिस्तानवर विजय मिळवला आणि या सामन्यात विराट कोहलीने पाकिस्तानविरोधात शतकी खेळीही केली. त्यानंतर आयआयटी बाबावर लोक अक्षरशः तुटून पडले आहेत.

दोन दिवसांपूर्वी आयआयटीवाल्या बाबाने भारतीय संघ पाकिस्तानविरोधात पराभूत होईल, अशी भविष्यवाणी केली होती. विराट कोहलीला म्हणावं कितीही जोर लाव टीम इंडिया पराभूत होणार म्हणजे होणार, असेही त्या बाबाने म्हटले होते, मात्र त्याची भविष्यवाणी सपशेल खोटी ठरली आहे. टीम इंडियाने निर्विवाद विजय मिळवला. त्यानंतर आता नेटकरी या आयआटी बाबाचा समाचार घेत आहेत. आज पाकिस्तानपेक्षा जास्त शिव्या या आयआयटी बाबाला पडत आहेत, असे एकाने म्हटले आहे.

# किमान लढत तरी द्यायची होती... पाकिस्तानी चाहत्यांची संघावर आगपाखड

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पहिल्या सामन्यात बांगलादेशला हरवल्यानंतर रविवारी टीम इंडियाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली. पाकिस्तानच्या या लाजिरवाण्या पराभवानंतर सोशल मीडियावर एकीकडे तुफान मीम्स व्हायरल होत असताना दुसरीकडे पाकिस्तानी चाहत्यांच्या संतप्त प्रतिक्रियाही व्हायरल होत आहेत. काही चाहत्यांनी तर सामना चालू असतानाच स्टेडियममध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या.

पाकिस्तानच्या पराभवानंतर दुबईत सामना पाहायला आलेल्या पाकिस्तानी क्रिकेट चाहत्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. एका चाहत्याने कॅमेऱ्यासमोर बोलताना पाकिस्तान संघाकडून किमान लढत देण्याची अपेक्षा व्यक्त केली. एका चाहत्याने तर सामना पाकिस्तान गमावत असल्याचे दिसताच मैदानातच ऐकवायला सुरुवात केली. शाहीन आफ्रिदी सीमारेषेवर क्षेत्ररक्षणासाठी उभा असताना शाहीन भाई, अजून किती लाज आणणार आहात? आमची काय चूक आहे? आम्हालाही सांगा. आम्ही काय वाईट केले तुमचे? सांगा तरी आम्हाला, असा जाब या चाहत्याने विचारला.

### 'जुन्यांना बाजूला सारून नवे चेहरे घ्या'

एका पाकिस्तानी युवतीने संघ ३५० धावांपर्यंत जाईल असे वाटले होते, अशी प्रतिक्रिया दिली आहे. आम्हाला खूप आशा होत्या, पण आमच्या टीमला २५०पर्यंतही जाता आले नाही. आमच्या टीमचा पराभव झाला तरी किमान त्यांनी कोहलीची सेंच्युरी होऊ द्यायला नको होती. बॅटिंग चांगली करता आली नाही तर किमान बॉलिंग तरी चांगली करायला हवी होती. चांगल्या बॉलिंगच्या मदतीने सामना वाचवता आला असता. माझी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला विनंती आहे की, जुन्या लोकांना बाजूला सारा आणि नवे चेहरे घेऊन या जेणेकरून आपल्या खेळात सुधारणा होईल, असा सल्ला या युवतीने दिला आहे.

जीवेत् शरदः शतम्!
अमेय खामकर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
राजेश सकटे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com